# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०७ जुलै, २०२६ / आषाढ १६, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

### हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळास त्रिगुणी लस निर्मितीसाठीच्या प्रयोगशाळेचे अदयावतीकरण करण्यास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * ८७७७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.शिवाजीराव गर्जे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.संजय भेंडे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील १३५ वर्षांची परंपरा असलेल्या व जगातील १३० हून अधिक देशांना लस पुरविणाऱ्या हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळातील डीपीटी (घटसर्प, डांग्या खोकला, धर्नुवात) लसीचे सीड स्ट्रेन रिलायन्स लाईफ सायन्स या खाजगी कंपनीला व्यावसायिक अटीवर विकत देण्याचे शासनाने प्रस्तावित केल्याने याविरोधात कर्मचाऱ्यांनी व विविध संघटनांनी माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळास लहान मुलांच्या त्रिगुणी लस निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या प्रयोगशाळेचे अद्यायावतीकरण गत २४ वर्षांपासून निधीअभावी प्रलंबित असून त्यासाठी आवश्यक १५० कोटी रुपयांच्या निधी प्रस्तावास शासनाची मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जागतिक आरोग्य संघटनेकडून मिळालेल्या लसीचे संयुग (लसीची सीड स्ट्रेन) कोणत्याही खासगी कंपनीला देण्याऐवजी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने स्वत: लसीचे उत्पादन सुरु करावे अशी शिफारस माशेलकर समितीच्या अहवालात केली असतानाही सदर हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे खासगीकरण करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, हाफकिनसारख्या शासकीय संस्थेचे खासगीकरण झाल्यास भविष्यात लसींचे दर वाढून सर्वसामान्य जनतेवर आरोग्य सेवेचा आर्थिक भार येणार असून संस्थेच्या खासगीकरणाऐवजी उक्त संस्थेस सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेला रुपये १५० कोटींचा निधी उपलब्ध करुन सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित हे देशातील शासकीय लस उत्पादक संस्थापैकी एक महत्वाचे व १०० वर्षाचा इतिहास असलेले महामंडळ असून सन २००७ पासून "त्रिगुणी (DPT) लसीचे" उत्पादन करण्यासाठी अद्ययावत उत्पादन प्रकल्प उपलब्ध नसल्यामुळे DPT लसीचे उत्पादन पूर्णपणे बंद झालेले आहे. हाफकीन औषध जीव निर्माण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ४ डिसेंबर,२०२५ रोजी झालेल्या बैठकीत (Agenda Item no. ६) त्रिगुणी (DPT) लसीच्या उत्पन्नासाठी संयुक्त भागीदारी (Joint Venture) तत्वावर बाजारातील मागणी व इच्छुक कंपन्यांची संख्या जाणून घेण्यासाठी Expression of Interest (EOI) जाहीर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, महामंडळाकडून ग्लोबल EOI जाहिरात दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी वर्तमानपत्रात देण्यात आली होती.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाने सुरु केलेल्या उपरोक्त प्रक्रियेविरोधात काही संघटनांनी माहे एप्रिल, २०२६ मध्ये आंदोलन केले होते.

सदर ग्लोबल EOI चा उद्देश संयुक्त उत्पादन (Joint Venture) पध्दतीने महामंडळास कायमस्वरूपी उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध होऊ शकतो का, याबाबत प्राथमिक चाचपणी करण्याचा होता. सदर ग्लोबल EOI ला केवळ "Reliance Life Science" या एकाच कंपनीकडूनच स्वारस्य दर्शविण्यात आले होते. हाफकीन औषध जीव निर्माण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या २५२ बैठकीत (Agenda Item no. १७) सदर ग्लोबल EOI मान्य करण्यात आलेला नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळाचे एकूण मूल्यमापन करून महामंडळाचा सर्वांगिण विकास कसा होईल याबाबत उपाययोजना सुचविणेबाबत शासनाने दिनांक ०६/०६/२०१७ रोजी डॉ. आर. ए. माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन केली होती. सदर समितीने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पाच प्रकल्पाकरीता (निर्जिवित बाल पक्षाघात, पंचगुणी लस, उतीवर्धित श्वानदंशलस, पिंपरी, पुणे येथील प्रतिविष व रक्तजल उत्पादन विभागाचे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिकीकरण, जैव संयोजित रक्तघटकांधारीत घटक ८ व ९) उत्पादन संयंत्राचे अत्याधुनीकरण व उन्नतीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पनिहाय वित्तीय सहाय्य करण्याची शिफारस केली होती. सदर शिफारशीमध्ये उक्त पाच प्रकल्पाकरीता रुपये ११०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने रुपये १०० कोटी व उर्वरीत निधी केंद्र शासनाने भाग भांडवल म्हणून वित्तीय सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत नमूद केले आहे.

हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळाने निर्जिवित बाल पक्षाघात लस या प्रकल्पाकरीता रुपये ५० कोटी व पिंपरी, पुणे येथील प्रतिविष व रक्तजल उत्पादन विभागाचे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे

आधुनिकीकरण करण्याकरीता रुपये १०० कोटी असे एकूण रुपये १५० कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अभिप्राय देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली होती. वित्त विभागाने त्रुटीपूर्तता करण्याबाबत कळविले असून त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १५ % खाटा राखीव ठेवण्याच्या अटीचे ग्लोबल रुग्णालयाकडून पालन होत नसल्याबाबत

**(२) * ९०५८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून रुग्णालयांना देण्यात आलेल्या सवलतीनुसार परवानगीमधील अटी व शर्तींला अधीन राहून एकूण खाटांपैकी १५ % खाटा राखीव ठेवण्याची अट घातल्याबाबत दिनांक १३ डिसेंबर, २००५ रोजी परिपत्रक काढण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या शिफारशीने महानगरपालिकेच्या रुग्णालयांना दराप्रमाणे १५ % खाटा देण्याची अट असतानाही परळ येथील ग्लोबल रुग्णालयाच्या प्रशासनाने दिनांक १३ डिसेंबर, २००५ रोजीच्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे उल्लंघन करणे, १५ % खाटा गरीब रुग्णांकरीता आरक्षित न ठेवणे, विविध सोयी-सुविधांचा लाभ न घेणे, गत १५ वर्षात एकही खाट उपलब्ध करुन देण्यात न येणे, एका खाटेमागे ५००० रुपये प्रतिदिन आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रूग्णालयात गत १५ वर्षात रुपये १०० कोटी एवढ्या रकमेची अनियमितता झाली असून याबाबत अनेक बैठका होऊनही तसेच सदर रुग्णालयाने नियमांचे उल्लंघन करुन अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे गरीब रुग्ण सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्लोबल रुग्णालयाच्या अनागोंदी व अनियमित कामकाजाची सखोल चौकशी करुन दोषी रुग्णालय प्रशासनावर कठोर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांना व संबंधित विभागाकडे दिनांक १९/७/२०२५, १४/८/२०२५, ९/९/२०२५, २९/९/२०२५ व तदनंतर २/२/२०२६,११/२/२०२६ रोजी पत्रव्यवहाराद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानगरपालिकेच्या रुग्णालयातील गरीब रुग्णांना दरानुसार १५ % खाटा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

विकास नियंत्रण नियमावली नियम, १९९१ च्या नियम-३३(२) मधील अटी व शर्तीवर अतिरिक्त बांधकाम क्षेत्र (Additional FSI) देण्याच्या मोबदल्यात वर्मा मेडिसीन रिसर्च ट्रस्ट, मुंबई यांनी केलेल्या मागणीनुसार दिनांक १३ डिसेंबर, २००५ रोजीच्या पत्रान्वये रुग्णालयास बांधकाम परवानगी देण्यात आली. त्यामधील अट क्रमांक २५ नुसार रुग्णालयास १५% खाटा राखीव ठेवण्याची अट लागू करण्यात आली आहे.

या अटीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे केईएम हॉस्पीटल, परळ व कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी नामनिर्देशित केलेल्या रुग्णांकरीता हे रुग्णालय देत असलेल्या वेगवेगळया उपचार पध्दतीमध्ये १५% याप्रमाणे ३७ खाटा आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. तथापि, रुग्णालयाने सदर अटीचा भंग केल्याचे आढळून आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) यासंदर्भात दिनांक २७ मे, २०२५, दिनांक २ फेब्रुवारी, २०२६ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेने वर्मा मेडिसीन रिसर्च ट्रस्ट, मुंबई यांना दिनांक ४ जुलै, २०१२ व दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र दिले आहेत.

दरम्यान ट्रस्टने सेंटर फॉर डायजेस्टीव ॲण्ड किडनी डिसीजेस इंडिया प्रा. लि. (ग्लोबल हॉस्पीटल) यांच्याशी सामंजस्य करार करुन रुग्णालयाची इमारत वापरास दिली.

दरम्यान १५% आरक्षित खाटांबाबतच्या अटी व शर्तींच्या भंगाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने ग्लोबल हॉस्पीटल यांना महाराष्ट्र शुश्रुषा नोंदणी कायदा, १९४९ मधील तरतूदीनुसार दिनांक ३१ मे, २०२२ रोजी नोटीस दिली. त्याविरुध्द रुग्णालयाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ४०४/२०२३ दाखल केली आहे.

तसेच जागेचे मालक वर्मा मेडिसीन रिसर्च ट्रस्ट, मुंबई यांना दिनांक २० मे, २०२६ रोजी भोगवटा प्रमाणपत्र का रद्द करण्यात येऊ नये, अशी कारणे दाखवा नोटीस दिली. त्याविरुध्द वर्मा मेडिसीन रिसर्च ट्रस्ट यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्रमांक १८४०४/२०२६ दाखल केली आहे.

यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका एकत्रित करुन दिनांक २४ जून, २०२६ रोजी मा.न्यायालयासमोर सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीमध्ये अपिलकर्त्याच्या वकीलांनी, उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका किंवा प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांशी अपिलकर्ते संपर्क करुन सदर समस्येचे निराकरण करण्याबाबत माहिती दिली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील “दि नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया” संस्थेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला अपुरा निधी मिळत असल्याबाबत

**(३) * ८९६४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या सुमारे १९००० स्क्वेअर मीटर जागेवर उभारण्यात आलेल्या दि नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया (एनएससीआय) या संस्थेच्या डोम मधून महानगरपालिकेला अपेक्षित महसूल मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेचा वापर मूळ क्रीडा संकुलाऐवजी व्यावसायिक कारणासाठी मोठ्या प्रमाणात होत असल्याने संबंधित संस्थेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेने रुपये ६० कोटी एवढ्या रकमेचा दंड वसुल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागेवर कंत्राटदाराने अनेक अनधिकृत बांधकामे केल्याचा आणि जागेच्या वापरातील बदल करून व्यावसायिक कार्यक्रमासाठी याचा वापर करून, एका दिवसाच्या कार्यक्रमातून कोट्यवधी रक्कम जमा करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेला केवळ दीड ते दोन लाख रुपये महसूल मिळत असून सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या मालकीचा ७०३७६ चौ.मी. (अंदाजे १७.३९ एकर) क्षेत्रफळाचा ९९ वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या कालावधीकरीता "दि नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया" या संस्थेस दिनांक १ जानेवारी, १९५१ पासून मक्त्याने देण्यात आला आहे. याकरीता प्रतिवर्ष रुपये ४३,५७२/-इतके भुईभाडे आकारण्यात येते. याशिवाय सदर संस्थेद्वारे वेळोवेळी केलेल्या वाढीव बांधकाम व वापरातील बदलाच्या पोटी अतिरिक्त भूईभाडे आकारण्यात येते. सद्य:स्थितीत, अतिरिक्त भूईभाड्याची रक्कम रुपये ३,३९,४१९/- इतकी आहे.

महानगरपालिकेच्या धोरणानुसार सन २०१४ ते २०२० या कालावधीमध्ये दि नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया यांनी विविध त्रयस्थ संस्थांशी करार करुन प्रतिवर्षी प्राप्त केलेल्या महसुलाबाबत सनदी लेखापालाद्वारे प्रमाणित केलेले लेखाविवरणपत्र सादर करणे व त्यानुसार महानगरपालिकेचा ३३% हिस्सा देणे बंधनकारक होते. सदर त्रयस्थ संस्थांशी केलेल्या कराराबाबत सन २०१६ साली महानगरपालिकेने दि नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तसेच, सदर प्रकरणी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी नोव्हेंबर २०१८ व नोव्हेंबर २०१९ या कालावधीत संस्थेला मक्त्याने दिलेल्या जागेसंदर्भात लेखा परिक्षण केले. त्यामध्ये उपस्थित केलेल्या लेखा परिच्छेदाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने सन २०१४ ते २०२० या कालावधीकरीता महानगरपालिकेचा ३३% हिस्सा याकरीता रुपये ६१.४६ कोटी व दंडनीय व्याज रुपये ६.२१ कोटीची अशी एकूण रुपये ६७.६७ कोटी रक्कमेची वसुली केली आहे.

कोविड-१९ या विषाणूचा प्रसार झाल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदरचे स्टेडिअम सन २०२० ते २०२२ या कालावधीकरीता ताब्यात घेतले होते. तद्नंतर सन २०२२ ते २०२६ या कालावधीत महानगरपालिकेचा ३३% हिस्सा व त्यावरील व्याज याकरीता रुपये ५.८० कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(३) दि नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया या संस्थेने मंजूर बांधकामापेक्षा अनधिकृत बांधकाम व वापरातील बदल केल्याचे निदर्शनास आले होते. त्यासाठी संस्थेकडून रुपये ११.९९ कोटी इतकी दंडाची वसूली करण्यात आली आहे. तसेच यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार रुपये ३४.६२ लाख इतकी दंडाची रक्कम आकारुन नियमितीकरणास मान्यता दिली आहे.

सदर प्रकरणी सद्य:स्थितीत दि नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया यांचेकडून धोरणाप्रमाणे महानगरपालिकेच्या ३३% हिश्याची नियमितपणे वसुली करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्थर रोड (महालक्ष्मी) येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत विकासकाने सफाई कामगारांच्या पात्र झोपड्या समाविष्ट केल्या नसल्याबाबत

**(४) * ८६५४ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थर रोड (महालक्ष्मी) येथे सुरु असलेल्या समूह झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत 'मे. श्रीपती बिल्ड इन्फ्रा इन्वेस्टमेंट लि.' या विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या पात्र झोपड्या समाविष्ट केल्या नसल्याची बाब दिनांक ३ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षे वास्तव्य करीत असलेले बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सफाई कामगार/झोपडीधारक कायदेशीर पुरावे उपलब्ध असतानाही त्यांचा परिशिष्ट - २ मध्ये समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणच्या सुमारे २४०० चौ. फुटाच्या मेघवाल समाजाच्या सभागृहाचा देखील परिशिष्ट - २ मध्ये समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आर्थर रोड (महालक्ष्मी) येथे सुरू असलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या पात्र झोपड्यांना तसेच मेघवाल समाजाच्या सभागृहाला समाविष्ट करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

आर्थर रोड, महालक्ष्मी येथील न.भू.क्र. ६०, १/६१, - २/६१ चे क्षेत्र बृहन्मुंबई - महानगरपालिकेच्या मालकीचे असून त्यावर महानगरपालिकेच्या सफाई कामगारांकरीता वसाहत होती. सदर जागेवर सफाई कर्मचायांकरीता २२५ इतक्या सेवा सदनिका होत्या.

आर्थर रोड, महालक्ष्मी येथील न.भू.क्र. ६०, १/६१, २/६१, १बी १/६२, ३/१, तसेच न.भू.क्र २०५४ ते २०६५, लोअर परळ येथे विकासक मे. श्रीपती बिल्ड इन्फ्रा इन्वेस्टमेंट लि. यांनी बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामावली, २०३४ मधील नियमावली ३३(९) अंतर्गत समूह पुनर्विकास योजनेचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केला होता.सदर योजनेस आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीचे (HPC) झालेल्या बैठकीमध्ये चर्चा होऊन विषयांकित योजनेबाबत शासनाचे मान्यतेसाठी केलेल्या शिफारशीनुसार योजनेस पुर्व मान्यता देण्याबाबत प्रस्तावास शासनाने दिनांक १८/०२/२०२२ तसेच दि१९/०४/२०२४ चे पत्रांद्वारे त्यास विवक्षित अटीचे पुर्ततेसापेक्ष पूर्व मान्यता दिली आहे त्यानुसार महानगरपालिकेने सुधारित इरादा पत्र दिनांक २१/०५/२०२४ रोजी दिले आहे. त्यानुसार एकत्रित ३४०६४.३५ चौ.मी क्षेत्रावर सदर क्लस्टर अंतर्गत योजना राबविण्यात येत असून सद्य:स्थितीत २२८४१.०३ चौ.मी क्षेत्रावर महानगरपालिकेने नकाशे मंजुरी दिली आहे.

सदर योजनेस बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३०/०३/२०२४ रोजी अमान्यतेची सूचना(IOD) दिली असून त्यानंतर जोत्यापर्यंतचे बांधकामासाठी प्रमाणपत्र दिनांक १५/०७/२०२४ रोजी देण्यात आले आहे. तदनंतर पुनर्वसन इमारती इमारतीचे सुधारित आरखडे दिनांक ०५/०९/२०२५ रोजी मंजूर करण्यात आले आहे. तर दोन पुनर्वसन इमारत व एक विक्री इमारत करीता ७ व्या पोडीयम मजल्यापर्यंत बांधकाम परवानगी दिनांक ०३/०६/२०२६ रोजी दिली आहे.

सदर योजनेमध्ये महानगरपालिकेच्या जागेवर असलेल्या अधिकृत २२५ सेवा निवासस्थाने धारकांचा समावेश असून ते महानगरपालिकेचे कर्मचारी असल्याने त्यांच्याकरीता परिशिष्ट-२ ची आवश्यकता नसल्याचे महापालिकेने कळविले आहे.

तसेच, १५ झोपडीधारक हे महानगरपालिकेच्या मालकीच्या सेवा सदनिका असलेल्या आवारात अतिक्रमण करून राहत असल्याने त्यांना सध्या स्थलांतरीत करण्यात आले असून त्यादरम्यान त्यांच्याकडून पात्रता / अपात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे दिनांक १८/०२/२०२६ रोजी महानगरपालिकेस प्राप्त झाली असून त्यांची पात्रता तपासून उचित निर्णय घेण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे. सदरचे १५ झोपडीधारक हे महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत किंवा कसे, ही बाब देखील तपासण्यात येत असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवा निवासस्थान असलेल्या जागेच्या आवारात सभागृहाचे बांधकाम होते. तथापि, बांधकामाचे क्षेत्रफळ निश्चित किती होते याबाबतचा तपशिल महानगरपालिकेकडे उपलब्ध नसून याबाबतचे परिशिष्ट २ तयार करण्यात आलेले नाही. तथापि, विकासकाकडून बांधण्यात येणाऱ्या सेवासुविधांमध्ये मंदिर, सभागृह, बुध्दविहार, व्यायाम दरम्यान शाळा इ. सुविधांचा समावेश करण्यात आले असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## मुंबईतील दादर येथील 'संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालना'ची दुरवस्था झाल्याबाबत

**(५)** * **८६४८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (पश्चिम) येथील शिवाजी पार्क परिसरात सन २०१० मध्ये उभारलेले 'संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालन' प्रशासकीय दुर्लक्षामुळे दुरवस्थेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत चार वर्षांपासून या ऐतिहासिक दालनाच्या देखभालीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे ऐतिहासिक वारशाची मोठी विटंबना होत असून, देखभाल व सुशोभीकरणासाठी असलेल्या शासकीय निधीचा विनियोग योग्य पध्दतीने न झाल्याने निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दालनातील सिलिंग तुटलेले असून व छताच्या गळतीमुळे भिंतींवर ओल आली आहे, परिणामी इतिहासाची साक्ष देणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रांना बुरशी लागली असून अस्वच्छता आणि कबुतरांचा वावर यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या गौरवशाली इतिहासाचे हे प्रेरणास्थान दुर्लक्षित राहिल्यामुळे सर्वसामान्य जनतेतून संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्मृतीदालनाच्या दुरवस्थेवरून मा.विरोधी पक्ष नेते, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ६ एप्रिल, २०२६ रोजी ठिय्या आंदोलन केले होते तसेच गत चार वर्षांपासून बृहन्मुंबई महानगरपालिकेत प्रशासक असताना दालनाची पूर्णपणे उपेक्षा झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१० मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतून सदर ३ मजली दालनात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास (फोटो, शिल्पे) मांडला असून, सदर दालनाच्या दुरवस्थेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू दालनाच्या नुतनीकरणाचे काम तातडीने हाती घेण्याबाबत शासनाकडून कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालनाचे व्यवस्थापन, परिरक्षण व सफाईची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येतात.

(३) सदरच्या दालनात सन २०२५ च्या पावसाळ्यामध्ये एका ठिकाणी प्लॅस्टर ऑफ पॅरिसचे सिलिंग तुटल्याचे आढळून आले. त्याबाबत तात्काळ उपाययोजना करण्यात आली.

सदर दालनात कबुतरांचा वावर नसून दालनात नियमित स्वच्छता करण्यात येत असल्याने कुठेही छायाचित्रांना बुरशी लागल्याचे आढळलेले नाही.

(४) सदरच्या दालनास मा.विरोधी पक्षनेते, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ६ एप्रिल, २०२६ रोजी भेट देऊन ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे.

(५) मुंबई येथील दादर शिवाजी पार्क परिसरात ‘संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालन’ सन २०१० मध्ये उभारण्यात आले आहे. सदर दालनाच्या वास्तुचे माहे मे, २०२४ तसेच माहे मार्च, २०२६ मध्ये संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करण्यात आले आहे. त्यामध्ये सदर दालनासह संपूर्ण वास्तुची दुरुस्ती सूचविण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खराडी (ता.हवेली, जि.पुणे) येथील ‘व्हर्टिलास’ हाऊसिंग सोसायटीमधील सदनिकाधारकांची विकासकाने फसवणुक केल्याबाबत

**(६) * ९४१९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खराडी (ता.हवेली, जि.पुणे) येथील ‘व्हर्टिलास’ हाऊसिंग सोसायटीमधील सदनिकाधारकांची २०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याची बाब दिनांक २ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सदनिकाधारकांनी ९५ टक्के रक्कम भरुनही विकासकाने सदनिकांचा ताबा न दिल्याने सदनिकाधारकांवर आत्मदहन करण्याची वेळ आली असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फसवणूक करणाऱ्या संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) खराडी, ता.हवेली, जि.पुणे येथील व्हर्टिलास नावाचा प्रकल्प महारेराकडे दिनांक ०६/०९/२०१७ रोजी नोंदणीकृत झाला होता.सदर प्रकल्प पूर्ण होण्याचा दिनांक ३०/१२/२०२१ असा होता, तथापि, विकासकाने मागणी केल्याप्रमाणे सदर प्रकल्प पूर्ण होण्यास दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंतची मूदतवाढ महारेरा प्राधिकरणाने दिली होती.

या प्रकल्पामध्ये एकूण १४४ सदनिका असून त्यापैकी १३२ सदनिकांची विक्री झालेली आहे. प्रकल्पातील १०६ सदनिकाधारकांनी महारेरा प्राधिकरणाकडे स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार विकासकाविरुध्द सदनिका ताब्यात मिळण्यास झालेल्या विलंब कालावधीचे व्याज मिळणेबाबत/ सदनिकेची व्याजासह रक्कम मिळणेबाबत महारेरा प्राधिकरणाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या.त्यातील १०० तक्रारींवर प्राधिकरणाने सुनावणी घेऊन विकासकाने सदनिकाधारकांना व्याजासह रक्कम परत द्यावी, संबंधित सदनिकाधारकांना सदनिकेचा ताबा देण्यास झालेल्या विलंबाबाबत व्याज द्यावे याबाबत आदेश पारीत केले आहेत.

प्राधिकरणाने दिलेल्या आदेशाचे अनुपालन विकासकाने केले नसल्यामुळे ६६ सदनिकाधारकांनी विकासकाविरुध्द प्राधिकरणाकडे Non Compliance अर्ज दाखल केले आहेत. त्यावर प्राधिकरणाकडून स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ नुसार कार्यवाही सुरु आहे.

प्राधिकरणाने दिलेल्या आदेशाचे किंवा निर्देशांचे अनुपालन विकासकाने आदेशात नमूद कालावधीत केले नाही तशा अशा कालावधीनंतरच्या प्रत्येक दिवसासाठी विकासकाला दंड आकारण्याची तरतूद स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ६३ मध्ये आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील चिन्मय हॉस्पिटलमध्ये उपचारातील निष्काळजीपणामुळे बालिकेचा मृत्यू झाल्याबाबत

**(७) * ८८५१ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील नवी पेठेतील चिन्मय हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी दाखल केलेल्या ११ महिन्यांच्या बालिकेचा मृत्यू झाला असून, सदर प्रकरणी पालकांनी दिलेल्या तक्रारीनंतर या घटनेच्या चौकशीसाठी हे प्रकरण ससून रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीकडे सोपविण्यात आल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डॉक्टर तसेच परिचारिकेने चुकीच्या पध्दतीने उपचार केल्यामुळे व त्यांच्या वैद्यकीय निष्काळजीपणामुळेच बालिकेचा मृत्यू झाल्याचा स्पष्ट निष्कर्ष तज्ज्ञ समितीने आपल्या अहवालात नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने बालिकेच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या संबंधित दोषी डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तज्ज्ञ समितीचा अहवाल आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये पनीरऐवजी ॲनालॉगचा वापर होत असल्याबाबत

**(८) * ८९६१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणात पनीर ऐवजी ॲनालॉगचा वापर होत असल्याच्या तक्रारी करण्यात येत असून, ग्राहकांची दिशाभूल टाळण्यासाठी अशा आस्थापनांनी मेनू कार्डवर ॲनालॉगचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्याबाबत मा.मंत्री, अन्न व औषध प्रशासन यांनी माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणते आदेश / परिपत्रक जारी केले आहे, त्याच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदर निर्देशांचे पालन न करणाऱ्या हॉटेल / आस्थापनांवर आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण करणाऱ्या अशा पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर प्रत्यक्षात कारवाई झाली नसल्याची बाब निदर्शनास आली असून, ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी व नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी देयकांवर, इलेक्ट्रॉनिक दर्शक फलकावर आणि मेन्यूकार्डवर "चीज, पनीर ॲनालॉग" (वनस्पतीजन्य पदार्थांपासून बनवलेले पनीरसदृश उत्पादन) स्पष्ट नमूद करणे बंधनकारक करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) राज्यातील काही हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणात पनीर ऐवजी ॲनालॉगचा वापर होत असल्याच्या तक्रारी निदर्शनास येत असून ग्राहकांची दिशाभूल टाळण्यासाठी अशा आस्थापनांनी मेनू कार्डवर ॲनालॉगचा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, यांनी दिनांक २०/०३/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील पनीर व चीज ॲनालॉग उत्पादकांना त्यांच्या मेन्यूकार्डमध्ये स्वयंस्पष्ट उल्लेख करण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत. तसेच आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या दिनांक २५/०३/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व रेस्टॉरंट/हॉटेल्स/केटरर्स/फास्ट फूड विक्रेते आस्थापनांना दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत मेन्यूकार्ड/इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवरती "चीज ॲनालॉग" चा स्पष्ट उल्लेख करणे बंधनकारक केले आहे.

त्यानुषंगाने दिनांक ०१ मे, २०२६ पासून ज्या आस्थापनांकडून सदर निर्देशांचे पालन केले जाणार नाही, त्यांच्याविरुध्द अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ तसेच त्याअंतर्गत नियम व नियमने यानुसार

कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सर्व सह आयुक्त (अन्न) यांना दिले आहेत. त्यानुसार तपासणी मोहीमे मध्ये राज्यात दिनांक ०५/०५/२०२६ ते १५/०६/२०२६ या कालावधीत चीज ॲनालॉग व पनीर बाबत हॉटेल/रेस्टोरंट/फास्ट फुड विक्रेते यांच्या एकूण ४१५८ आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या असून त्यापैकी ३३७८ आस्थापनांच्या मेन्यूकार्ड/इलेक्ट्रिक डिस्प्ले बोर्ड /उत्पादकाचे मेन्यूकार्डमध्ये पनीर व चीज ॲनालॉग चा स्पष्ट उल्लेख केल्याचे निदर्शनास आले. उर्वरित ७८० आस्थापनांना उल्लंघन केल्या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहेत व त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहेत. सदर उल्लंघन प्रकरणी एकूण ०८ तडजोड अर्ज दाखल केले असून त्यापैकी ०५ प्रकरणे निकाली काढली असून त्यामध्ये १२५००० /- रुपये एवढा दंड ठोठावण्यात आला आहे व उर्वरित ०३ प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.सहआयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (अन्न) यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील रेस्टॉरंट/हॉटेल्स/केटरर्स/फास्ट फूड विक्रेते यांना FoSCoS पोर्टल वरून बल्क मेसेजिंग द्वारे चीज ॲनालॉगचा मेन्युकार्ड/इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड इत्यादी वरती स्पष्ट उल्लेख नमूद करणे आवश्यक असल्याचे अवगत केले आहे. तसेच राज्य परवानाधारक चीज ॲनालॉग चे उत्पादक/पुरवठादार यांना चीज ॲनालॉगचा विक्री/पुरवठा करताना विक्री बिलावर चीज ॲनालॉग स्पष्ट उल्लेख करण्याचे निर्देश दिले आहेत व त्यानुषंगाने संपूर्ण राज्यात त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

तसेच अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका आयुक्त, सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष, आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचनालय बेलापूर, नवी मुंबई या सर्वांशी पत्रव्यवहार करून त्यांना त्यांच्या अधिनस्त यंत्रणेमार्फत वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमात चीज ॲनालॉगबाबत जनजागृती करण्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रतीक्षा नगर सायन (मुंबई) येथील संक्रमण शिबीर इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(९) * ९६८० श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रतीक्षा नगर सायन (मुंबई) येथील ३० वर्षांहून अधिक जुन्या झालेल्या ८८ धोकादायक संक्रमण शिबिरातील (ट्रान्झिट कॅम्प) इमारतींमधील सुमारे ८,२०० पेक्षा जास्त रहिवाशांचा पुनर्विकास अभ्युदयनगर व काळाचौकी येथील रहिवाशांच्या पुनर्विकासाप्रमाणे करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी सहकार भवनाच्या उद्घाटन कार्यक्रमात म्हाडा उपाध्यक्षांना दिल्या असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाने प्रकल्प अहवाल तयार केला आहे काय, किती वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचे म्हाडाचे नियोजन आहे, तसेच प्रकल्प अहवालाला मान्यता देण्यापूर्वी लोकप्रतिनिधी आणि स्थानिक रहिवाशांच्या संघटना यांना त्याचे सादरीकरण करण्यात येईल काय, त्यांच्याकडून सूचना मागविल्या जातील काय,

(३) असल्यास, धोकादायक इमारतींची पाहणी करून म्हाडाच्या माध्यमातून पुनर्विकास प्रक्रिया गतिमान करुन भाडेकरूंना धोकादायक ट्रान्झिट कॅम्पमधून कायमस्वरूपी आणि सुरक्षित घरांमध्ये स्थलांतरित

करण्याकरीता उक्त प्रस्तावास मान्यता मिळून सदर प्रकल्प अहवाल म्हाडाने तातडीने सादर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रतिक्षानगर सायन येथील म्हाडा अभिन्यासातील संक्रमण शिबीर इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्याची म्हाडा स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम नगरपरिषदेंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते रेल्वे लाईनपर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१०) * ९३९१ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम नगरपरिषदेंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते रेल्वे लाईनपर्यंतचा डी.पी. रोड हा विशिष्ट नागरी सुविधा अंतर्गत मंजूर झाला असून, सदर रस्त्याचे काम ७० टक्के पूर्ण झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित रस्त्याचे काम संबंधित शेतकऱ्यांना डी.डी.आर. न मिळाल्यामुळे थांबविण्यात आले असून त्याना तात्काळ डी.डी.आर. देऊन रस्त्याचे प्रलंबित काम लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरचा रस्ता हा नगरपरिषद हद्दीमधील नागरिकांच्या वाहतुकीकरीता अस्तित्वात असलेला रस्ता असून रुंदीकरणाचे स्वरुप नाही. तसेच, उर्वरित रस्त्याचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्याबाबत संबंधित कंत्राटदार यांना दिनांक २९/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेकडून कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित कंत्राटदाराने रस्त्यांच्या कामास सुरुवात केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवरी (जि.गोंदिया) येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ लगतचे अतिक्रमण हटविण्याबाबत

**(११) * ९१५६ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरी (जि.गोंदिया) गावातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ च्या सर्व्हिस रोडवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून हा रस्ता पार्किंग झोन बनला असल्याची बाब माहे एप्रिल,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी सर्व्हिस रोडवर वाहने, दुकाने, आणि गॅरेजचा ताबा असल्यामुळे पादचारी आणि स्थानिक वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, अवैध पार्किंगमुळे सर्व्हिस रोडची रुंदी कमी होऊन नागरिकांना चालणे कठीण झाल्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होऊन अपघातांचा धोका वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गावर तहसिल कार्यालय, पंचायत समिती आणि ग्रामीण रुग्णालय यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय संस्था असून अतिक्रमणामुळे रुग्णवाहिका व सामान्य नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ठराविक अंतरावरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम प्रभावीपणे राबवून सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण कायमस्वरूपी हटवून रस्ता मोकळा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१), (२), (३) व (४) देवरी गावातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ ची देखभाल व दुरुस्ती भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात येते.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अहवालानुसार राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील महाराष्ट्र-छत्तीसगड सीमा ते भंडाऱ्यापर्यंत नियमित देखभाल व वाहतूक व्यवस्थापनाचा भाग म्हणून Routine Patrolling पथकामार्फत अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमा नियमितपणे राबविण्यात येतात. यामध्ये रस्त्यालगतचे फेरीवाले, दुचाकी व चारचाकी वाहनांचे अनाधिकृत पार्किंग इ. स्वरूपातील तात्पुरती अतिक्रमणे वेळोवेळी हटविण्यात येतात. अतिक्रमणधारकांना अतिक्रमण हटविण्याबाबत नोटिसेस देण्यात आलेल्या असून अतिक्रमणे हटविण्याची मोहिम प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक सहकार्य मिळणेबाबत संबंधित पोलीस यंत्रणेस विनंती करण्यात आली आहे. स्थानिक प्रशासन व पोलीस विभागाच्या सहकार्याने अतिक्रमण काढण्याचे नियोजन आहे.

वाहतूक कोंडी विचारात घेऊन वाहतूक सुरळीतता व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत ठिकाणी उड्डाणपूलाचे काम मंजूर झाले आहे व कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून उड्डाणपूलाचे काम त्वरीत सुरु करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कूपर रुग्णालयामध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याबाबत

**(१२) * ९१२५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कूपर रुग्णालयामध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने आर्थिक क्षमता नसलेल्या रुग्णांना सार्वजनिक वैद्यकीय विमा योजनेंतर्गत उपचारांचे लाभ मिळणे आवश्यक असतानाही प्रत्यक्षात या विमा योजनेचा लाभ रुग्णांना दिला जात नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधांच्या तुटवड्यामुळे रुग्णांना औषधे स्वखर्चाने बाहेरुन विकत घ्यावी लागत असून मूलभूत उपचार वेळेवर न मिळणे, आवश्यक तपासण्यांमध्ये होणारा विलंब यास्तव रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेण्याची गरज भासत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालयातील औषधांचा तुटवडा दुर करुन नियमित औषधांचा पुरवठा व्हावा याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

कूपर रुग्णालयामध्ये पुरेसा औषधसाठा उपलब्ध आहे.

या व्यतिरिक्त गरीब रुग्णांना समाज विकास अधिकाऱ्यामार्फत (MSW) तसेच धर्मदाय निधीतून औषधे उपलब्ध करुन दिली जातात.

तसेच जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना व प्रधानमंत्री जीवनदायी योजना या शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमार्फत रुग्णांवर नि:शुल्क उपचार करण्यात येतात आणि आवश्यक ती औषधे उपलब्ध करुन दिली जातात.
(२) हे खरे नाही.

कूपर रुग्णालयाकडे ३ महिन्याचा राखीव साठा (Buffer Stock) कायमस्वरुपी उपलब्ध असतो. त्यामुळे कोणत्याही रुग्णांना स्व:खर्चाने बाहेरुन औषधे विकत घेण्याचा सल्ला दिला जात नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयाकरीता मध्यवर्ती खरेदी खाते विभाग यांचेमार्फत दरपत्रक निश्चित करुन देण्यात येते. त्यानुसार प्रत्येक रुग्णालय पुरेसा औषध साठा खरेदी करते. त्यामुळे औषधांचा तुटवडा निर्माण होत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर दरम्यानच्या रस्त्याची दुरुस्ती करून सुरक्षेच्या उपाययोजना करण्याबाबत

**(१३) * ९९३५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग ७५३-एफ वरील अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर या रस्त्याची खड्डे व निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे दुरवस्था झाली असून, घाट विभागात रिफ्लेक्टर, संरक्षक कठडे आणि रस्ता खुणांचा तीव्र अभाव असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्ग दोन प्रमुख शहरांना जोडणारा व मराठवाड्याला जोडणारा महत्त्वाचा दुवा असताना रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढून प्रवाशांच्या व वाहनचालकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला असून, सार्वजनिक निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामार्गावरील वडाळा ते अहिल्यानगर टप्प्यातील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असल्यामुळे परिसरात धुळीचे लोट निर्माण होऊन नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत व बांधकाम नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या महामार्गावरून दररोज सुमारे १५ ते २० हजार अवजड वाहनांची वाहतूक होत असताना संबंधित यंत्रणा व कंत्राटदार कंपन्यांकडून वेळेत खड्डे दुरुस्ती व समतलीकरणाचे काम न झाल्याने प्रवाशांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली असून संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करून पावसाळ्यापूर्वी या संपूर्ण रस्त्याची दुरुस्ती व घाट भागातील सुरक्षा उपाययोजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्याची एकूण लांबी १०४.२०० कि.मी. असून सदर लांबीतील वडाळा ते छत्रपती संभाजीनगर (६२.६०० कि.मी.) BOT तत्त्वावर विकसित असून, रस्ता सद्य:स्थितीत सुस्थितीत आहे.

तसेच, अहिल्यानगर ते वडाळा (४१.६०० कि.मी.) रस्ता सन २०२५ मधील अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झाला होता.तथापि, सन २०२५ च्या पावसाळ्यानंतर या ४१.६० कि.मी. लांबीवरील खड्डे डांबराने भरण्यात आले असून, जास्त क्षतीग्रस्त झालेल्या १८ कि.मी. लांबीच्या दुरुस्तीचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.

सदर कामाची गुणवत्ता व तपासणी नियमितपणे केली जात असून, कामाच्या प्रगती व गुणवत्तेबाबत कंत्राटदाराला वेळोवेळी सूचना दिल्या जात आहेत.
(४) रस्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी खड्डे डांबर व खडीने भरून रस्ता दुरुस्त करण्यात आला असून जास्त क्षतीग्रस्त झालेल्या रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. आखाती युद्धाच्या परिस्थितीमुळे डांबराच्या तुटवड्यामुळे कामात अडचण व काहीसा विलंब होत आहे.

तसेच, कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी अहिल्यानगर ते वडाळा या संपूर्ण ४१.६०० कि.मी. रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे करीता जून, २०२६ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर काम अर्थसंकल्पात समाविष्ट करून, निविदा प्रक्रिया पूर्ण करून त्वरित सुरू करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका हददीत धोकादायक इमारती मोठ्या प्रमाणात असल्याबाबत

**(१४) * १०२३५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत सुमारे ४ हजार ४३७ इमारती धोकादायक असून, महानगरपालिकेने या सर्व इमारतींमधील रहिवाशांना घरे रिकामी करण्याच्या आणि दुरुस्तीच्या नोटीसा बजाविल्या असून नागरिकांनी पावसाळा सुरू होण्यापूर्वी आपली इतरत्र राहण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन करण्यात आले असून एखादी दुर्घटना घडून वित्तहानी, जीवितहानी झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही असा इशारा दिला असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह नजीकच्या शहरांमध्ये धोकादायक इमारतींचे प्रमाण वाढत असून अनेक इमारती या जीर्ण आणि धोकादायक स्थितीतही अनेक कुटुंबे या इमारतींमध्ये वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेकडून शहरातील अनेक इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये अनियमितता झाली असल्याचे तसेच बहुतेक इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये धोकादायक आणि अतिधोकादायक असा अहवाल आला आहे, तर इमारती रिकाम्या करण्यास नागरिक तयार नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इमारती रिकाम्या करण्याच्या मोहिमेला महानगरपालिकेच्या वतीने सुरुवात करण्यात आली असून इमारती रिकाम्या करताना महानगरपालिका प्रशासनाला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू धोकादायक इमारतीमधील नागरिकांचे पुनर्वसन योग्य पध्दतीने करून या इमारती रिकाम्या करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात रहिवाशी, इमारत मालक व विकासक यांच्यात एकमत होत नसल्यामुळे इमारतीचा भोगवटा रिक्त केल्यास त्यांचा हक्क संपुष्टात येईल असे रहिवाशांना वाटत असल्याने अतिधोकादायक इमारती रिकाम्या करण्यास नागरिक तयार नसतात.
(४) होय, हे खरे आहे.
(५) खाजगी मालकीच्या धोकादायक इमारतीमधील रहिवाशांच्या पर्यायी निवासाची व्यवस्था करण्याची जबाबदारी कायद्याप्रमाणे महापालिकेची नाही. मात्र मानवतेच्या दृष्टीकोनातून उपलब्धतेनुसार संक्रमण शिबिरात तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था करण्यात येते. तसेच, सी-१ वर्गवारीतील अतिधोकादायक बांधकामांमधील ज्या भोगवटाधारकांची इतरत्र भाडे भरुन राहण्याबाबत आर्थिक परिस्थिती नाही, अशा भोगवटाधारकांना घरभाडे देण्याबाबत ठाणे महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेतलेला असून त्याकरीता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (प.) येथील मच्छी बाजाराचे स्थलांतरण प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * १०३१२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड (प.) येथील सोमवार बाजार परिसरात नवीन मच्छीबाजार उभारुनही मासळी व मटन विक्रेत्यांना अद्याप जुन्या, पडीक आणि धोकादायक बाजारामध्येच व्यवसाय करावा लागत असून सध्या जुन्या बाजाराची अवस्था अत्यंत धोकादायक असून छत कोसळण्याची तसेच अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून अनेक ग्राहक खरेदीसाठी तेथेच जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पी-उत्तर विभागातील या परिसरात गत दहा वर्षांपासून जुने मच्छी मार्केट जीर्ण अवस्थेत असून या लगत बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुमारे तीन ते चार वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्च करून नवीन, सुसज्ज मच्छी मार्केट उभारले परंतु आजपर्यंत अधिकृत मासळी विक्रेते आणि मटन दुकानदारांना त्या नव्या मार्केटमध्ये स्थलांतरित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जुने मार्केट तोडून नवीन बांधावे आणि आधुनिक सुविधा द्याव्यात यासाठी सन २०१६ पासून पाठपुरावा करण्यात येत असूनही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणती कार्यवाही केली जात नसून नवीन मार्केट तयार होऊन चार वर्षे झाली तरी विक्रेत्यांना तेथून हलविले नसल्यासंदर्भात शासनाने हस्तक्षेप करुन सर्व विक्रेत्यांचे नवीन बाजारात स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील मालाड (प.) येथे अंदाजे ४५ वर्षापूर्वी उभारलेली बैठ्या स्वरुपाची पत्राशेड असलेली सोमवार बाजार मंडई आहे. यामध्ये परवानाधारक ८८ मासळी विक्रेते व १३ मांस विक्रेते व तत्सम संबंधित व्यावसायीक आहेत. सदर मंडई धोकादायक झाल्याने मंडईचा पुर्नविकास करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आली आहे.
(२) परवानाधारकांची पर्यायी व्यवस्था म्हणून सदर भूखंडापासून १०० मीटर अंतरावर अंदाजे ८० लक्ष रुपये खर्च करुन संक्रमण शिबीर उभारण्यात आले आहे. तथापी, परवानाधारक विक्रेते या संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत होण्याकरीता तयार नाहीत. सदर परवानाधारक व्यापाऱ्यांना संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत होण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वेळोवेळी आवश्यक नोटीस बजावण्यात आली आहे.
(३) सोमवार बाजार मंडईचा पुर्नविकास करण्याकरीता सन २०२१ पासून कार्यवाही करण्यात येत आहे. या ठिकाणी तळ मजला व वरील ६ मजले अशा प्रकारे संरचना प्रस्तावित असून उपलब्ध करुन दिलेल्या संक्रमण शिबीरात परवानाधारक विक्रेते स्थलांतरीत झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मंडईचा पुर्नविकास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "वेस्ट टू वंडर" प्रकल्पांतर्गत आर्थिक अनियमितता झाल्याबाबत

**(१६) * १०४१८ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत "वेस्ट टू वंडर" हा प्रकल्प राबविण्यात आला असून या प्रकल्पांतर्गत अंदाजे रुपये ३० कोटी एवढ्या रक्कमेची कामे केवळ ०.५० टक्के कमी दराने दिल्लीच्या ठेकेदारास देण्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी लागणारे भंगार साहित्य महानगरपालिकेकडून उपलब्ध करून देण्यात आले असताना केवळ मजुरीच्या स्वरूपात विविध स्कल्पचर निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही कामांमध्ये ठेकेदाराकडून २५ टक्के रक्कम घेऊन त्याच ठेकेदाराला पुढील प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी पुन्हा कामे देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, "वेस्ट टू वंडर" (Waste to Wonder) प्रकल्पातील कंत्राटदाराची निवड आणि त्यातील अनियमिततेची सखोल चौकशी करून दोषींवर कंत्राटदारांची निवड प्रक्रिया (Tendering Process) आणि त्यासाठी झालेल्या आर्थिक व्यवहारांची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्यात चौकशीत जर कोणी अधिकारी, कर्मचारी किंवा कंत्राटदार दोषी आढळल्यास, त्यांच्यावर शासनाने कोणती दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी भविष्यातील कामांमध्ये गैरव्यवहार टाळण्यासाठी निविदा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता असावी, तसेच आवश्यक असल्यास कंत्राट रद्द करून फेरनिविदा काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ कलाकृती निर्माण करण्याकरीता खालील ३ निविदा काढणेत आलेल्या आहे.

i) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील विविध ठिकाणी Waste to Wonder टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ कलाकृती निर्मिती करून उद्यान विकसित करण्याकरीता रुपये ८,०१,६७,०१४/- इतक्या रक्कमेची निविदा काढण्यात असून आदेश M/s. Z.Tech India.Pvt.Limited यांना दिनांक ०६/०२/२०२४ रोजी देण्यात आले असून त्याचा निविदा दर ०.५०% कमी इतका आहे.

ii) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील विविध ठिकाणी Waste to Wonder टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ कलाकृती निर्मिती करून World Park विकसित करण्याकरीता रुपये ११,०९,८४,३४८/- इतक्या रक्कमेची निविदा आदेश M/s. Z.Tech India.Pvt.Limited यांना दिनांक ८/११/२०२४ रोजी देण्यात आले असून यामध्ये कामाच्या रक्कमेचा हिस्सा ७५:२५ असा निश्चित करण्यात आला असून (२५% हिस्सा ठेकेदार यांचा) त्याचा निविदा दर ०.३०% कमी इतका आहे.

iii) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील विविध ठिकाणी Waste to Wonder टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ कलाकृती निर्मिती करून Bollywood Park विकसित करण्याकरीता रुपये ९,७९,७६,०४९/- इतक्या रक्कमेचे आदेश M/s. Z.Tech India.Pvt.Limited यांना दिनांक ०८/१०/२०२४ रोजी देण्यात आले असून त्याचा निविदा दर ०.३०% कमी इतका आहे.
(२) अंशतः खरे आहे.

सदर प्रकल्पातून बनविण्यात येणाऱ्या कलाकृतीकरीता महापालिकेकडून भंगार साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. त्याचप्रमाणे प्रत्येक कलाकृतीकरीता आवश्यकतेनुसार ठेकदाराने स्वत: कडील साहित्य वापरले असून, त्यासाठी ठेकेदारास जादा रक्कम अदा करण्यात आली नाही. तसेच, बनविण्यात आलेल्या कलाकृतीचे दर खुल्या बाजारातून कोटेशनद्वारे मागणी करून प्राप्त दरामधील सर्वात कमी दर

योग्य आहे. याची छानणी / तपासणी करण्यासाठी महाराजा सयाजीराव विश्वविद्यालय, बडोदा-गुजरात (Faculty of Fine Arts) यांच्याकडे पाठविण्यात आले. सदर दर योग्य असल्याचे त्यांनी कळविले नंतर ते दर वापरून प्रत्येक कलाकृतीचे दरपृथकरण करून त्यास शहर अभियंता यांची मान्यता घेण्यात आली व सदरचे दर वापरून वर नमूद कामांची निविदा काढण्यात आली आहे. त्यानंतर प्राप्त लघुत्तम दराच्या कंत्राटदारास कामाचे आदेश देण्यात आले आहे. प्रत्येक कलाकृतीचे देयक Waste to Wonder टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ कलाकृती निर्मिती करून उद्यान विकसित करणे, World Park विकसित करणे या कामाकरीता निविदा दरानुसार अदा करण्यात आले आहे. तथापि, Bollywood Park विकसित करण्याचे काम सुरु झाले नसून त्याचे कुठलेही देयक ठेकेदारास अदा केलेले नाही.

(३) अंशतः खरे आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील विविध ठिकाणी Waste to Wonder टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ कलाकृती निर्मिती करून उद्यान विकसित करणे, World Park विकसित करणे व Bollywood Park विकसित करणे कामाच्या निविदा अटी शर्तीनुसार एकूण निविदा रक्कमेच्या २५ % रक्कम ठेकेदाराची असून मनपाचा हिस्सा ७५ % आहे. ठेकेदारास पुढील प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी देण्यात आलेले नाही. तसेच, World Park या प्रकल्पाचे काम ठेकेदारास परिचालन व देखभाल दुरुस्तीकरीता देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे भारत मंडपम उभारण्याच्या प्रस्तावाला मंजूरी दिल्याबाबत

**(१७) * १०४७६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटरच्या धर्तीवर पुणे येथे खासगी कंपनीच्या माध्यमातून "भारत मंडपम" उभारण्याच्या प्रस्तावाला शासनाने मंजूरी दिली असल्याचे दिनांक ६ मे, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोहगांव विमानतळानजीक सुमारे ४८.७५ एकर क्षेत्रावर हा प्रकल्प उभारण्याचे नियोजन असून मूळ विकास आराखड्यानुसार या परिसरात क्रीडांगण, रुग्णालय, पार्किंग, पाणीपुरवठा सुविधा, भाजी मार्केट, उद्यान अशा सहा सार्वजनिक आरक्षणांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यशासनाने जाहीर केलेल्या नियमानुसार येथील जमीन वापराबाबत मोठे बदल करण्यात आले असून एकूण आरक्षित जमिनीपैकी ५० टक्के भागावर हा प्रकल्प तर उर्वरित ५० टक्के भागावर व्यावसायिक व निवासी प्रकल्प उभारण्याची परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेली जमीन खासगी विकासकांच्या ताब्यात जाणार असून ही शासनाची लूट असल्याने यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच सदर प्रकल्प रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मौ. लोहगाव येथील स.नं.२३६ व स.नं.२३८ या जमिनींवरील मंजूर विकास योजनेनुसारच्या आ.क्र.P-६७ पार्किंग, आ.क्र.H-१६ हॉस्पिटल, आ.क्र.VM-३३ भाजी मंडई, आ.क्र.WW-६ वॉटर वर्क्स आणि EP-१३१ नुसार बगीचा व खेळाचे मैदान या सर्व आरक्षणांचे वापर बदल करुन त्यांचे सर्व क्षेत्र 'भारत मंडपम' या प्रयोजनार्थ निर्देशित करण्यासाठी तसेच, उक्त जमिनीवरील विकास योजनेनुसारचे सर्व रस्ते रद्द करुन त्याऐवजी, पश्चिम हद्दीवरील ३० मी. रुंद रस्त्यापासून अस्तित्वातील २२ मी. रुंद रस्त्यापर्यंत उत्तरेस त्याच हद्दीलगत २४ मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणे व पूर्व पश्चिम २२ मी. रुंद अस्तित्वातील रस्ता, कलम २०५ अन्वये ३० मी. रुंद आखलेला रस्ता कायम ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वयेचा फेरबदल प्रस्ताव पुणे महानगरपालिकेने पत्र क्र.मआ/शअजा/१५३८५, दिनांक ३०/०३/२०२६ अन्वये शासनास मान्यतेस्तव सादर केला आहे.

तथापि, सदर प्रस्तावास शासनाने मंजूरी प्रदान केलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या सन २०१७ मधील मंजूर विकास योजनेमध्ये पार्किंग (P-६७), हॉस्पिटल (H-१६), वॉटर वर्क्स (WW-६), भाजी मंडई (VM-३३) हे चार आरक्षण दर्शविले आहेत. तसेच EP-१३१ अन्वये शासनाने क्रीडांगण (PG) व गार्डन (G) या दोन आरक्षणांचा समावेश आहे.

(३) हे खरे नाही.

अशी कोणतीही परवानगी शासनामार्फत देण्यात आलेली नाही.

केंद्र शासनाच्या "भारत मंडपम" नवी दिल्ली या सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर पुणे येथे सांस्कृतिक चळवळ, संगीत कला केंद्र / मैफील केंद्र यासाठी आरक्षण ठेवण्यात यावे, अशी मागणी काही लोकप्रतिनिधींनी शासनास केली आहे. तसेच राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या विशेष कृती आराखड्यामध्ये "भारत मंडपम" हा विषय अंतर्भूत आहे.

त्यानुषंगाने राज्यातील काही महानगरपालिकांच्या मंजूर विकास योजनेत "भारत मंडपम" प्रयोजनाकरीता काही क्षेत्र आरक्षित करण्याबाबत दिनांक २०/०३/२०२५ रोजी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश पारित केलेले आहेत.

त्यास अनुसरून मौ. लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे येथील स.क्र.२३६ व स.क्र.२३८ या जागेवरील पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील आरक्षणांमध्ये फेरबदल करून "भारत मंडपम" प्रयोजनार्थ सदर जागा आरक्षित करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल प्रस्ताव दिनांक ३०/०३/२०२६ रोजी पुणे महानगरपालिकेमार्फत शासनास सादर करण्यात आलेला आहे. तथापि, त्यास अद्याप शासनामार्फत मंजुरी देण्यात आलेली नाही.

(४) मंजूर विकास आराखड्यातील मौ. लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे येथील स.क्र.२३६ व स.क्र.२३८ ही जागा खाजगी असल्याने तसेच उपरोक्तप्रमाणे वस्तुस्थिती असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) उपरोक्त वस्तुस्थितीनुसार विलंब झालेला नाही.

----------------

## महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाटातील अपघात रोखण्यासाठी सुरक्षात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(१८) * १०५९६ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर–पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाटात स्कॉर्पिओ वाहन खोल दरीत कोसळून सातारा जिल्ह्यातील आठ तरुणांचा मृत्यू झाल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघात ज्या ठिकाणी झाला त्या ठिकाणासह आंबेनळी घाटातील अनेक धोकादायक वळणांवर पुरेशा प्रमाणात सुरक्षा कठडे, संरक्षक जाळी, इशारा फलक व अन्य सुरक्षा उपाययोजना नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाची बस दिनांक २८ जुलै, २०१८ रोजी महाबळेश्वरला सहलीसाठी जात असताना पोलादपूरजवळील आंबेनळी घाटात आल्यावर रस्त्यावरील मातीच्या ढिगाऱ्यावरून घसरुन थेट ५०० ते ८०० फूट खोल दरीत कोसळून ३० कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू होऊनही उक्त रस्त्याची अद्याप दुरुस्ती करुन घेतली नाही तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी प्रशासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत पाच वर्षांत आंबेनळी घाटात अनेक अपघात झाले असून त्यामध्ये किती व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या व किती जखमी झाल्या याची वर्षनिहाय माहिती काय आहे, आंबेनळी घाटातील अपघातप्रवण ठिकाणांची पाहणी करून तेथे मजबूत सुरक्षा कठडे, संरक्षक जाळी, परावर्तित इशारा फलक, रंबल स्ट्रिप्स, सीसीटीव्ही कॅमेरे व अन्य आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २४/०५/२०२६ रोजी पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावरील आंबेनळी घाटातील सा.क्र. २१/१३५ येथे झालेला अपघात हा वाहनचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने झाला आहे व पोलीस पंचनाम्यात त्याप्रमाणे नोंद आहे.

(२) हे खरे नाही,

सदरच्या अपघातस्थळाजवळील रस्त्याची रुंदी १४.० मी. एवढी असून रस्त्याच्या कडेला Anti-crash barrier, सुरक्षा कठडे, माहिती व दिशादर्शक फलक इत्यादी लावण्यात आलेले आहेत व याबद्दलचा उल्लेख पोलीस पंचनाम्यात व त्यासोबतच्या नकाशात आहे.

(३) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर ते रानकडसरी राज्य -महामार्ग क्र. १३९ वरील साखळी क्र. ०/०० ते २४/०० एकूण लांबी २४.०० किमी रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (MSIDC) यांचेकडून हायब्रीड ॲन्युइटी (HAM) योजनेतंर्गत प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीत पोलादपूर - महाबळेश्वर राज्य मार्ग १३९ वरील पोलादपूर ते रानकडसरी दरम्यान रस्त्याच्या रुंदीकरणाचे तसेच मोऱ्या व बॉक्स कल्वर्ट नुतीनीकरण, रस्त्याच्या कडेची गटारे, संरक्षक भिंत तसेच काही भागात डांबरी करणाचे काम प्रगतीत आहेत.

(४) पोलादपूर पोलीस ठाणे यांच्या अहवालानुसार आंबेनळी घाटात झालेले अपघाताची वर्षनिहाय माहिती पुढीलप्रमाणे-

| वर्ष | एकूण अपघात | मयत व्यक्तींची संख्या | जखमी व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|
| २०२० | २ | १ | ७ |
| २०२१ | १ | १ | १ |
| २०२२ | २ | ० | ५ |
| २०२३ | ३ | ३ | ० |
| २०२४ | २ | ० | ६ |
| २०२५ | २ | ० | १८ |
| २०२६ | १ | ८ | ० |

पोलादपूर- महाबळेश्वर राज्य मार्ग १३९ वरील पोलादपूर ते रानकडसरी दरम्यान रस्त्याच्या रुंदीकरणाचे तसेच मोऱ्या व बॉक्स कल्वर्ट नुतीनीकरण, रस्त्याच्या कडेची गटारे, संरक्षक भिंत तसेच काही भागात डांबरी करणाचे काम प्रगतीत आहेत. सद्य:स्थितीत आंबेनळी घाटात अपघातप्रवण ठिकाणी सुरक्षा कठडे, Crash Barrier, सुचना फलक इत्यादी लावण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुर्गम भागातील शेतकरी धान खरेदीच्या हमीभावापासून वंचित राहिल्याबाबत

**(१९) * १०६१८ श्री.प्रमोद जठार :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात दुर्गम व डोंगराळ भागांमध्ये मोबाईल नेटवर्कअभावी, तांत्रिक अडचणी व प्रशासकीय दिरंगाईमुळे शेतकऱ्यांना खरीप हंगाम, २०२५ मध्ये ‘ई-पीक पाहणी’ नोंदणी करता आली नसल्याने सुमारे २,६१२ शेतकरी शासनाच्या धान खरेदी हमीभावापासून वंचित राहिल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २,६१२ शेतकऱ्यांनी तहसिल कार्यालयात शासनाने दिलेल्या निर्देशानुसार ऑफलाईन प्रस्ताव सादर करुन उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पणन विभागाकडे पाठविला आहे, तथापि, प्रशासकीय यंत्रणेच्या संथ कारभारामुळे कालापव्यय होऊन दिनांक ३१ जानेवारी, २०२६ ही अंतिम मुदत संपेपर्यंत निर्णय न झाल्याने व ३१ मार्च, २०२६ पर्यंत भात खरेदी सुरु असूनही पोर्टलवर नोंदणी न स्वीकारल्यामुळे सदर २,६१२ अर्ज अद्यापही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ऑफलाईन अर्ज केलेल्या २,६१२ शेतकऱ्यांना शासनाच्या हमीभावापासून वंचित राहावे लागू नये व त्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून तिची अंमलबजावणी केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येते. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेच्या अंमलबजाणीमध्ये पारदर्शकता व पात्र शेतकऱ्यांची अचूक पडताळणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ७/१२ उताऱ्यावर ई-पीक पाहणी अंतर्गत नोंद झालेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येते. योजनेंर्तगत शेतकरी नोंदणी करण्यासाठी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत मुदत होती. त्यानंतर ही मुदत प्रत्येकी १ महिना याप्रमाणे दोन वेळा वाढवून देण्यात आली. ही मुदत ३१ जानेवारी, २०२६ रोजी समाप्त झाली. या मुदतीत अशा प्रकारचा सिंधुदुर्ग जिल्ह्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. धान खरेदीची अंतिम मुदत दिनांक ३१ मार्च, २०२६ होती. सदर मुदत उलटून गेली असून आता, रबी पणन हंगाम सुरु झाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोपरगांव येथील महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(२०) * १०६५० श्री.विवेक कोल्हे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगांव (जि.अहिल्यानगर) येथील पोहेगाव-संगमनेर महामार्गाच्या कामासाठी रुपये १० कोटींचा निधी खर्च करुन सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे या महामार्गावर एका निष्पाप विद्यार्थ्याचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठेकेदाराच्या कामात झालेल्या दिरंगाई व निष्काळजीपणामुळे कोपरगाव शहरातील येवला नाका ते आत्मा मलिक रुग्णालय या चार कि.मी अंतरात दिनांक १ जानेवारी, २०२० ते दिनांक १ जून, २०२५ या कालावधीत ५३ अपघाताची व २१ मृत्यूंची पोलिसांकडे नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गाच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार, अनियमितता झाली असून निकृष्ट कामासंदर्भात संतप्त नागरिकांनी ठिय्या, रास्तारोको आंदोलन केले असून महामार्गाचे काम संथगतीने सुरु असून शासनाने सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषी ठेकेदारांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन यास जबाबदार असणाऱ्या संबंधित ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) तोलारखिंड-सावरचोळ-कोतुळ-संगमनेर-तळेगाव-कोपरगांव-पढेगांव-उक्कडगांव-वैजापूर (कि.मी. ८६/७०० ते १०३/२००) हा रस्ता राज्यमार्ग ६५ असा वर्गीकृत असून त्याची एकूण लांबी १६.५० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या एकूण १० कि.मी. लांबीतील (कि.मी. ९१/७०० ते ९४/७००, कि.मी. ९५/२०० ते कि.मी.९९/२०० व कि.मी. १००/२०० ते कि.मी. १०३/२००) काम माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये सा. बां. विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

नगर-मनमाड रा.म.क्र.१६० या महामार्गाच्या दुरुस्तीकरीता सदर महामार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक राज्यमार्ग ६५ वरील झगडेफाटा ते तळेगाव या लांबीवरून काही कालावधीकरीता वळविण्यात आली होती. सदर अवजड वाहतूकीमुळे काही ठिकाणी रस्ता क्षतिग्रस्त झाला होता.सदर कामाचा दोषदायित्व कालावधी माहे ऑक्टोबर, २०२६ पर्यंत आहे. दोषदायित्व कालावधीमध्ये संबंधित कंत्राटदारामार्फत सदर लांबीमध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत असून सदर रस्ता सुस्थितीत आहे.

पोलीस विभागाच्या अहवालानुसार जवळके रस्त्याच्या कडेला अपघाताची नोंद असून दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याअनुषंगाने गुन्हा दाखल केल्याची नोंद आहे.

(२) व (३) कोपरगाव शहर पोलीस स्टेशनच्या अहवालानुसार येवला नाका ते आत्मा मलिक रुग्णालय या लांबीमध्ये दिनांक १ जानेवारी, २०२० ते १ जून, २०२५ या कालावधीत ५३ अपघातामध्ये ३३ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पोलीस विभागाच्या अहवालानुसार महामार्गाचे निकृष्ट काम, ठेकेदाराची कामातील दिरंगाई व निष्काळजीपणा यामुळे अपघात झाल्याबाबत कोणत्याही स्वरूपाची तक्रार प्राप्त नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या आखत्यारीत कोपरगाव ते सावळी विहीर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२-जी ची एकूण ९.६६३ कि.मी. लांबी आहे. या लांबीमध्ये कोपरगाव शहरातील लांबी समाविष्ट आहे. कोपरगाव शहरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम माहे मार्च, २०२३ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदर लांबी सुस्थितीत आहे.

कोपरगाव ते सावळी विहीर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२-जी वरील ८.६६३ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाच्या कामास दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला एकूण ७.२५३ कि. मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम IRC मानकानुसार करण्यात आले असून सदर लांबी वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

पोलीस विभागाच्या अहवालानुसार माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये अहिल्यानगर-मनमाड रस्त्याच्या दुरूस्तीच्या अनुषंगाने रास्ता रोको झाल्याची नोंद आहे.

(४)१.४१ कि.मी. लांबीमधील सेवा रस्त्याच्या भूसंपादन प्रक्रियेमुळे व स्थानिक नागरिकांचा विरोध यामुळे कामास विलंब झाला आहे. सद्यास्थितीत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली असून उर्वरीत काम प्रगतीत आहे.

-----------------

## सोलापूर महानगरपालिका हद्दीतील शासकीय भूखंडावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(२१)** * **१०६७६ श्री.संजय भेंडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिका हद्दीतील ऐतिहासिक सिद्धेश्वर मंदिर परिसर, रेल्वे लाईन येथील नगर भूमापन (सी.टी.एस.) क्रमांक ८४१६ या शासकीय भूखंडावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत धार्मिक व खाजगी अतिक्रमण करण्यात आले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोक्याची जागा शासकीय मालकीची व सार्वजनिक वापरासाठी आरक्षित असताना कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची मंजुरी न घेता तेथे पक्के बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने या सी.टी.एस. ८४१६ मधील अतिक्रमणावर कालबध्द तोडकाम मोहीम राबविलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिद्धेश्वर मंदिर परिसर रेल्वे लाईन येथील या शासकीय भूखंडावरील सर्व अनियमित बांधकामे पूर्णपणे निष्कासित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील सि.स.नं. ८४१६ या भुखंडाच्या मालमत्ता पत्रिकेवर सोलापूर महानगरपालिकेची नोंद आहे व तसेच इतर हक्क मध्ये वक्फ प्रतिबंधक सत्ताप्रकार अशी नोंद आहे. सदर जागेवर वक्फ बोर्डाचा ताबा आहे. सदर जागेवर खाजगी अतिक्रमण झाले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर जागेवर कच्चे बांधकाम आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी वक्फ न्यायप्राधिकरणात अतिक्रमण कार्यवाही विरोधात दाखल दाव्याबाबत "जैसे थे" आदेश झाले असल्याने तोडकाम मोहिम स्थगित ठेवण्यात आली आहे.

महसूल व वन विभागाच्या दिनांक १३/०४/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर मिळकतीवर इतर हक्क सदरी वक्फ प्रतिबंधक सत्ताप्रकार अशी नोंद नगरभुमापन कार्यालयात दिनांक ३१/०५/२०१६ रोजी दाखल झाली असल्याने सोलापूर महानगरपालिकेने दिनांक १७/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये महसूल व वन विभागाकडे मार्गदर्शन मागितले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२२) * ८९८० ॲड.अनिल परब, श्री.एकनाथराव खडसे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गत १२ वर्षानंतरही अपूर्णावस्थेत असून लोणेरे ते दासगाव दरम्यान रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून अनेक ठिकाणी तडा, भेगा पडल्या असल्याची बाब दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामार्गाचे काम अपूर्ण असताना वाहन चालकांकडून टोल वसुली सुरु करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम माहे मे, २०२६ अखेरपर्यंत पूर्ण होईल असे आश्वासन केंद्रीय मंत्रीमहोदयानी देऊनही अदयाप काम अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, कणकवली-कसाल दरम्यान (जि.सिंधुदुर्ग) असलेल्या ओसरगाव टोल नाक्यावर टोल वसुलीसंदर्भात दिनांक १७ एप्रिल, २०२६ रोजी ऑनलाईन निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अपूर्ण असतानाही होणारी टोल वसुली तात्काळ बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच कोट्यवधी रक्कम खर्च होत असतानाच कामाच्या दर्जा विषयी शंका निर्माण झाली असून या राष्ट्रीय महामार्गाच्या संपूर्ण कामाची तात्काळ तपासणी करून मागील पंधरा वर्षांपासून प्रलंबित असलेला हा महामार्ग तातडीने वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावरील (NH-६६) वारंवार निकृष्ट काम, खड्डे व अपूर्ण रस्त्यांमुळे होणाऱ्या त्रासाची दखल घेत मा.मुंबई उच्च न्यायालयाने (Bombay High Court) राज्य शासन आणि 'एनएचएआय'ला (NHAI) कडक निर्देश दिले असून, सुरक्षिततेच्या उपाययोजना न करणाऱ्या कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ची एकूण लांबी ४७१.३० कि. मी. असून त्यापैकी ०/०० (पळस्पे) ते कि. मी. ८४/०० (इंदापूर) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम दोन पॅकेजमध्ये विभागले असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे. तसेच कि.मी. ८४/०० (इंदापूर) ते कि. मी. ४५०/१७० (झाराप) या लांबीतील चौपदरीकरणाचे काम दहा पॅकेजमध्ये विभागले असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीत आहे.

लोणेरे ते दासगाव ही लांबी सा. बां. विभागाकडे असलेल्या कामाच्या पॅकेज क्र. २ मधील असून सदर पॅकेजमधील काम २०२२ मध्ये पूर्ण झालेले असून ऑगस्ट २०२६ अखेर दोषदायित्व कालावधी आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंता (Independant/Authority Engineer) यांच्या देखरेखीखाली काम करण्यात आलेले आहे. दोषदायित्व कालावधीमध्ये कंत्राटदाराकडून देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.
(२) राष्ट्रीय महामार्गावरील पथकर वसुली राष्ट्रीय महामार्ग शुल्क (दर निर्धारण व वसुली) नियम, २००८ [The National Highways Fee (Determination Of Rates And Collection) Rules, २००८] नुसार केली जाते.

सद्यास्थितीत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कि.मी. ०/०० ते ४२/३०० या लांबीतील काम पूर्ण झाल्याने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिसूचनेस अनुसरून खारपाडा येथील पथकर नाक्यावर पथकर वसुली सुरू करण्यात आली आहे.
(३) मुंबई - गोवा रा. म. क्र. ६६ या महामार्गाच्या पनवेल ते झाराप एकूण ४३९.८८ कि.मी. लांबीपैकी ४३०.४० कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित लांबीतील काम प्रगतीत आहे.

इंदापूर व माणगाव बाह्यवळण ही कामे वगळता उर्वरीत सर्व कामे ऑगस्ट २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

भूसंपादन, वनजमिनीबाबत मंजूरी, कोवीड-१९, इ. कारणामुळे प्रथम टप्प्यात काम सुरू होण्यास विलंब झाला होता.

याव्यतिरिक्त फेब्रुवारी २०२६ नंतर युध्दजन्य परिस्थितीमुळे इंधन डिझेल व साहित्य तुटवडा यामुळे कामाच्या प्रगतीवर परिणाम झाला.

(४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी टोल व्यवस्थापनासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

(५) राष्ट्रीय महामार्गावरील पथकर वसुली राष्ट्रीय महामार्ग शुल्क (दर निर्धारण व वसुली) नियम, २००८ नुसार केली जाते. केंद्रशासनाच्या धोरणानुसार राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प स्वतंत्र पॅकेजनिहाय पध्दतीने राबविले जातात. विद्यमान धोरणानुसार पूर्ण झालेल्या पॅकेजवर पथकर स्वतंत्रपणे आकारला जातो.

सदर महामार्गाची कामे HAM व EPC तत्वावर राबविण्यात आली असून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंता (Independant/Authority Engineer) यांच्या देखरेखीखाली कामाची गुणवत्ता तपासली जाते.

(६) व (७) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ च्या कामाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामार्फत मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

सदर जनहीत याचिकेची सुनावणी पूर्ण होऊन मा.उच्च न्यायालयामार्फत दिनांक ०३ जानेवारी २०२४ रोजी निकाली काढण्यात आली आहे.

कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीत असलेल्या पॅकेज क्र, १ मधील कंत्राटदारासोबतचा करार समाप्त करण्यात येऊन नव्याने निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची घरे मालकी तत्त्वावर खरेदी करण्याचा प्रस्ताव दिल्याबाबत

**(२३) * ८९५६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या ३२३ सदनिका (tenements) एमएमआरडीए मालकी तत्त्वावर खरेदी करणार असून, ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी या सदनिकांचा वापर केला जाणार असून, यासाठी रुपये ४२ कोटींचा प्रस्ताव देण्यात आला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत या सदनिका भाडेतत्त्वावर एमएमआरडीएने घेतल्या होत्या, परंतु एमएमआरडीएला भविष्यातील प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात संक्रमण सदनिकांची (Transit Accommodation) आवश्यकता असल्याने खरेदी करण्याची तयारी दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संक्रमण सदनिका विकता येत नसल्याने, शिवशाहीने या खरेदीबाबत एसआरए (SRA) प्राधिकरणाकडे कायदेशीर प्रशासकीय सल्ला मागितला आहे तसेच शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मागाठाणे, बोरिवली ते टिकुजीनीवाडी, ठाणे दरम्यान दुहेरी भुयारी बोगदा प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्पग्रस्तांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना ३४३ कायमस्वरुपी संक्रमण सदनिका रुपये ८०००/- प्रतिमाह प्रति सदनिका या दराने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लिमिटेड यांनी सद्य:स्थितीत भाडेतत्वावर उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

दरम्यान, पश्चिम उपनगरात प्रकल्प बांधितांचे पुनर्वसन करण्यासाठी तसेच आगामी प्रकल्पांकरीता ३४३ कायमस्वरुपी संक्रमण सदनिका मालकीतत्वावर मिळण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांच्याकडे विनंती केली आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अभिप्राय मागितले असता, त्यांनी दिनांक २४ जून, २०२६ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लिमिटेड यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उध्दभवत नाही.

-----------------

## वसई (पश्चिम) येथील अनुपम संकुल सोसायटीतील गंभीर जखमी बालकावर उपचार करण्यास चार रुग्णालय प्रशासनांनी दिरंगाई केल्याबाबत

**(२४) * ८६८८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (पश्चिम) येथील अनुपम संकुल सोसायटीमध्ये दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी ४ वर्षीय विघ्नेश कोंढारे याला अमानुष मारहाण केल्यानंतर अत्यंत गंभीर जखमी अवस्थेत वसईतील तीन खाजगी व स्थानिक रुग्णालयांमध्ये त्याला तातडीने नेण्यात आले असता मुलाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगत त्याला दाखल करून घेण्यास थेट नकार दिला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रात्री ८:३० वाजता घडलेल्या घटनेत जखमी झालेल्या ४ वर्षाच्या मुलावर रात्री ११ वाजता रुग्णालयात उपचार सुरू झाले असल्याचे भयंकर वास्तव पोलिसांनी दाखल करून घेतलेल्या प्रथम माहिती अहवालामध्ये (एफ.आय.आर.) नमूद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच सदर घटनेतील जखमी बालकावर उपचार करण्यास दिरंगाई करणाऱ्या सदर तिन्ही रुग्णालय प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

विघ्नेश कोंढारे या बालकास दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी संध्याकाळी ०७:४५ वाजता सर डी.एम. पेटीट रुग्णालय, वसई (प.) (महागनरपालिका रुग्णालय) येथे दाखल करण्यात आले व प्राथमिक उपचार देण्यात आले. परंतु रुग्णाला PICU (Paediatric Intensive Care Unit) ची गरज असल्याने नातेवाईकांकडून रुग्णास कार्डिनल ग्रेसियस मेमोरियल हॉस्पिटल, वसई (प.), चिरायु चिल्ड्रन्स् हॉस्पिटल, वसई (प.), विकास चिल्ड्रन्स हॉस्पिटल, वसई (प.) या रुग्णालयांत उपचाराकरीता नेण्यात आले. परंतु, सदर तीनही खाजगी रुग्णालयांत PICU (Paediatric Intensive Care Unit) सुविधा नसल्याने विकास चिल्ड्रन्स् हॉस्पिटल, वसई (प) या रुग्णालयामार्फत वोकार्ड हॉस्पिटलचे डॉ. अंकित गुप्ता यांचेशी संपर्क करुन रुग्णास ऑक्सिजन सुविधेसह रुग्णवाहिकेने PICU (Paediatric Intensive Care Unit) सुविधा असलेल्या वोकार्ड हॉस्पिटल, मिरा-रोड येथे संदर्भित करण्यात आले.

(३) याबाबत संबंधित रुग्णालयांकडून खुलासे मागविण्यात आलेले असून PICU (Paediatric Intensive Care Unit) सुविधा कोणत्याही रुग्णालयामध्ये उपलब्ध नसल्याने सदर रुग्णालयांनी रुग्णास संदर्भित केल्याचे सदर तीनही रुग्णालयांनी कळविले आहे.

वोकार्ड हॉस्पिटल, मिरा-रोड येथे बालकाची प्रकृती उपचारादरम्यान हळूहळू स्थिर (Stabilized) झाली असून रुग्णास दिनांक ०८ एप्रिल, २०२६ रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज देऊन सुरक्षितपणे घरी पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल (अंधेरी) येथील 'सहारा विश्वचषक गॅलरी' तोडल्याबाबत

**(२५)** * ८६४९ **श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय क्रिकेट संघाने सन २०११ मध्ये जिंकलेल्या विश्वचषकाच्या अविस्मरणीय घटनांचा ठेवा जतन करून ठेवण्यासाठी १४ वर्षापूर्वी शहाजीराजे क्रीडा संकुल, अंधेरी, येथे उभारण्यात आलेल्या 'सहारा विश्वचषक गॅलरी' बृहन्मुंबई महानगरपालिकेने तोडली असल्याची बाब दिनांक ६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कारवाईमुळे या गॅलरीच्या उभारणीसाठी केलेल्या कोट्यवधी रक्कमेच्या निधीचाअपव्यय झाला असून या गॅलरीतील साहित्य, दिग्गज खेळाडूंचे मेणाचे पुतळे, विश्वचषकाची प्रतिकृति इत्यादी जतन करून ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई क्रीडा आणि ललितकला प्रतिष्ठानच्या शहाजी राजे भोसले क्रीडा संकुल, अंधेरी येथे भारताच्या क्रिकेट संघाने सन २०११ मध्ये जिंकलेल्या विश्वचषकाशी संबंधित अविस्मरणीय घटनांचा ठेवा जतन करुन ठेवण्याकरीता सहारा ग्रुपद्वारे संकुलातील ७३८१ चौ.फू. इतक्या जागेत गॅलरी उभारण्यात आली.

सदर गॅलरी उभारण्यासाठी जागेव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणताही खर्च केलेला नाही.

तथापि, सदर गॅलरीमध्ये प्रेक्षकांचा अल्पश: प्रतिसाद, तसेच इमारतीचे आयुर्मान ३० वर्षाहून अधिक झाल्याने व इमारतीमधून पाण्याची गळती होत असल्याने सदर गॅलरी तोडण्यात आली.

सदर गॅलरीतील खराब न झालेले उर्वरित साहित्य, खेळाडूंचे पुतळे व विश्वचषकाची प्रतिकृती संकुलातील एका खोलीमध्ये जतन करुन ठेवण्यात आलेली आहेत.

क्रीडा संकुलातील इतर प्रदर्शनी जागी सदरचे उपलब्ध साहित्य, खेळाडूंचे पुतळे व विश्वचषकाची प्रतिकृती विशेष सजावट करुन प्रदर्शित करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हरताळा ते सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२६) * ९४६९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरताळा ते सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) या रस्त्याचे काम गत चार वर्षांपासून कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे अपूर्ण असून सदर कामाच्या खोदकामामुळे या मार्गावर धुळीचे प्रमाण वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने ग्रामस्थांचे हाल होत असल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी तसेच संबंधित दोषी कंत्राटदारावर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) प्रश्नाधीन रस्त्याच्या वावापैकी संरक्षक भिंत व कॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्त्यावर अपूर्ण स्वरुपात खोदकाम वा धुळीचा प्रादुर्भाव असल्याची वा अपघात झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) कंत्राटदारामार्फत काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यानुषंगाने (कामाची प्रगती राखण्यानुषंगाने) निविदा अटी-शर्तीनुसार नोटीस देण्यात आली असून उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्याचा प्रयत्न आहे.

-----------------

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये बोगस उपसूचनांच्या आधारे कोट्यवधी रुपयांची देयके ठेकेदारांना अदा केल्याबाबत

**(२७) * ८९६६ श्री.योगेश टिळेकर, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नगरसेवकांनी सादर केलेल्या उपसूचना स्थायी समितीसमोर न ठेवता स्वतःकडेच ठेवून प्रशासकीय प्रक्रियेचे उल्लंघन करुन कोणत्याही स्पष्ट नियम अथवा तरतुदींमध्ये न बसणारे वर्गीकरण करून रुपये ६० कोटी एवढ्या रक्कमेची देयके मंजूर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेमध्ये बोगस उपसूचनांच्या आधारे तरतुदींमध्ये वाढ-घट करून रुपये ६० कोटी एवढ्या रक्कमेची देयके ठेकेदारांना दिल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाच सदस्यीय समितीने दिलेल्या प्राथमिक चौकशी अहवालात मुख्य लेखा व वित्त अधिकारी दोषी आढळून आलेअसून उपसूचना योग्य आहेत की नाही याची तपासणी करणे आवश्यक असतानाही त्यांनी चुकीचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणात ठेकेदारांशी संगनमत, आर्थिक अनियमितता किंवा अधिकाराचा गैरवापर झाला असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये बोगस उपसूचनांच्या आधारे तरतुदींमध्ये वाढ-घट करून ६० कोटी रुपयांची देयके ठेकेदारांना दिल्याप्रकरणी आढळून आलेल्या संबंधित दोषींची तसेच कार्यालयांमधील आर्थिक व्यवहारांची तसेच सदर प्रकरणाची राज्याच्या दक्षता विभागामार्फत सखोल चौकशी करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी चौकशी समितीकडून २० उपसूचना प्राप्त झाल्या होत्या. सदर उपसूचनांपैकी ३ उपसूचना वैध तर एकूण १७ उपसूचना अवैध असल्याचे समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(४) प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त-१ (IAS) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्य समिती गठीत करून चौकशी करण्यात आलेली आहे. त्यानुसार महापालिकेच्या लेखा विभागाचे तत्कालीन विभागप्रमुख मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक यांची वित्त विभागाच्या दिनांक २९/०५/२०२६ रोजीच्या आदेशान्वये इतरत्र बदली करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांना महानगरपालिका सेवेतून दिनांक ०४/०६/२०२६ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियमांचे उल्लंघन केल्यामुळे तत्कालीन लेखा विभागाचे विभागप्रमुख मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक यांना दिनांक १०/०६/२०२६ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत जाहिरात फलकांवरील नियंत्रणाकरीता जाहिरात फलकांवर 'क्यूआर कोड' बंधनकारक करण्याबाबत

**(२८) * ८९२६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत बेकायदा जाहिरात फलकांवर नियंत्रण आणण्यासाठी सर्व जाहिरात फलकांवर 'क्यूआर कोड' लावण्याचा सक्तीचा निर्णय घेतला असून या निर्णयामुळे बेकायदेशीर होर्डिंगला आळा बसणार असून प्रत्येक अधिकृत जाहिरात फलकाची परवानगी, मालकी हक्क आणि वैधतेची माहिती मोबाईलवरून स्कॅन करून पाहता येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'क्यूआर कोड' प्रणालीमुळे बेकायदा फलक ओळखणे आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून ज्या फलकांवर 'क्यूआर कोड' आढळणार नाही किंवा माहिती उपलब्ध होणार नाही असे फलक अनधिकृत ठरविण्यात येऊन याची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या परवाना व आकाशचिन्ह विभागाने हा निर्णय घेतला असून प्रत्येक जाहिरात फलकाच्या खालच्या उजव्या कोपऱ्यात क्यूआर कोड लावणे बंधनकारक असून कारवाईचे अधिकार क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील अनधिकृत जाहीरातींवर नियंत्रण ठेवण्यासाठी हा निर्णय महत्वपूर्ण ठरणार असून स्पष्ट होर्डींगची ओळख नागरिकाना होणार आहे तसेच राज्यातील इतर महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही अशाच प्रकारे 'क्यूआर कोड' प्रणाली लागू करण्याबाबत शासनाचे धोरण ठरविण्यात आले आहे काय, राज्यस्तरावर एकसमान धोरण (Uniform Policy) तयार करून त्याची अंमलबजावणी करुन कालबध्द कार्यक्रम तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मान्यताप्राप्त जाहिरात फलकावर 'क्यूआर कोड' लावणेबाबतची अंमलबजावणी दिनांक २५/०४/२०२६ रोजीच्या कार्यालयीन परिपत्रकाच्या दिनांकापासून एक महिन्यानंतर करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र महानगरपालिका आकाशचिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण नियम २०२२ मधील मुद्दा क्र.२२ (ग) मध्ये " जाहिरातफलकामार्फत जाहिरात प्रदर्शित करणारे अभिकरण, अभिकरणाची ओळख पटविणे सोईचे व्हावे यासाठी योग्य त्या आकारातील त्याच्या नावाची पट्टी आणि जाहिरातफलकाचा त्याला देण्यात आलेला अनुक्रमांक, जाहिरातफलकाच्या कोपऱ्यात दिलेल्या जागेत प्रदर्शित करील किंवा लावील, अभिकरण, परवान्याची मुदत संपण्याचा महिना व वर्षही प्रदर्शित करील." असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नगरविकास विभाग, शासन निर्णय दिनांक १४/११/२०२२ अन्वये प्रत्येक जाहिरात बॅनर / होर्डिंग इत्यादींवर अर्जदाराचे नाव, परवानगी

क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा QR कोड लावण्याची कार्यवाही सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांनी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कचरा डेपोतून उत्सर्जित होत असलेल्या मिथेन वायुमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

**(२९) * ९७०४ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाने प्लॅनेट लॅब्स च्या टॅनाटोर-१ उपग्रहाने आणि नासाच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील एमिट उपकरणाने सन २०२५ मध्ये संकलित केलेल्या माहितीचा अभ्यास करुन केलेल्या विश्लेषणावरुन प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार मुंबईतील कचरा डेपो केंद्रातून दर तासाला अंदाजे ४.९ टन मिथेन वायूचे उत्सर्जन होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक स्तरावर सर्वाधिक मिथेन उत्सर्जित करणाऱ्या शिर्ष ठिकाणांमध्ये मुंबईतील कांजूरमार्ग कचरा डेपो हा १२ व्या स्थानावर असून येथील कचराभूमीतून मिथेन वायूच्या उत्सर्जनाने कांजूर, भांडूप, विक्रोळी आणि मुलुंड परिसरातील जवळपास १५ लाख रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून कचराभूमीवरील मिथेन उत्सर्जनासह इतर बाबींचे बारकाईने निरीक्षण करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मा.उच्चन्यालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आदेशान्वये कांजूरमार्ग (मुंबई) येथील कचराभूमीवरील मिथेन वायू उत्सर्जनासह इतर बाबींचे निरीक्षण अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास मिथेन वायू उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) असल्यास, मिथेन वायूचे उत्सर्जन वाढीमुळे कांजूरमार्ग डंपिंग ग्राऊंड परिसरातील नागरिकांना श्वसनाचे आजार, त्वचारोग व इतर गंभीर आजार वाढल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्ट निर्देशांनंतरही हे डंपिंग ग्राऊंड सुरू असून येथील लागणाऱ्या आगी, विषारी धूर आणि दुर्गंधीमुळे नागरिकांचे जीवन असह्य झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करत पर्यावरण संरक्षण कायद्यांचे उल्लंघन होत असताना प्रदूषण नियंत्रण मंडळाची याबाबतची भूमिका काय आहे, तसेच कांजूरमार्ग येथील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी देण्यात आलेल्या कंत्राटदाराने कोणतीच कामे विहीत मुदतीत न केल्यामुळे निरीक्षण अहवालानुसार उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी तसेच कंत्राटदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिथेन वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी व डंपिंग ग्राऊंडवरील कचऱ्याचे कालबध्द पध्दतीने विघटन करुन शहरातील सर्व कचऱ्यांची सुयोग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाने (UCLA) दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी मिथेन उत्सर्जनावर अहवाल प्रसिध्द केला आहे. सदर अहवालात सन २०२५ मध्ये उपग्रहांद्वारे नोंदविलेल्या सर्वात मोठ्या मिथेन उत्सर्जन दरावर आधारित जगातील २५ कचरा-संबंधित स्थळांची क्रमवारी दिली आहे. सदर अहवालामध्ये मुंबईतील कांजूरमार्ग घनकचरा प्रक्रिया प्रकल्पामधून दर तासाला अंदाजे ४.९ टन मिथेन वायूचे उत्सर्जन होत असल्याची बाब नमूद केली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मुंबई मधील कांजूरमार्ग येथील कचराभूमीवरील मिथेन उत्सर्जनासह इतर बाबींचे निरीक्षण महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, स्वतंत्र प्रयोगशाळा (थर्ड पार्टी) यांचेकडून उपलब्ध यंत्रणेमार्फत करण्यात येत असून सदर अहवाल दिनांक ०२ जानेवारी, २०२६ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या मॉनिटरिंग कमिटीच्या तज्ज्ञ सदस्यांना सादर करण्यात आला आहे. सदर अहवालानुसार मिथेन व इतर वायुंचे प्रमाण मर्यादेच्या खाली येत असल्याचे व त्यामुळे आरोग्यास धोका नसल्याचे आढळून आले आहे.

मॉनिटरिंग कमिटीने मे.निरी (NEERI) या संस्थेकडून सविस्तर मिथेन लेखापरीक्षण (Methane Audit) करण्याचे तसेच त्यासंदर्भातील योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना (Mitigation Measures) सुचविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मे. निरी यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) हे खरे नाही.

कांजुरमार्ग परिसरातील मनपा दवाखाने व आपला दवाखान्यातील रुग्णाचा मागील ०३ वर्षाचा अहवाल पाहता श्वसन, त्वचा आणि डोळ्यांच्या रुग्णांमध्ये लाक्षणिक वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

नागरिकांना आगी, विषारी धूर आणि दुर्गंधीचा त्रास होऊ नये याकरीता मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या मॉनिटरिंग कमिटीच्या आदेशानुसार / मार्गदर्शनानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका व प्रकल्पासाठी नियुक्त केलेले प्रचालक यांच्याकडून आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तसेच त्याबाबतचा आढावाही मॉनिटरिंग कमिटीकडून घेण्यात येत आहे.
(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बृहन्मुंबई महानगरपालिका व कांजुर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी नियुक्त केलेले प्रचालक यांना दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजी कांजुर घनकचरा प्रकल्पातील दुर्गंधी नियंत्रणासाठी बायो-एन्झाईम द्रव्याची फवारणी वारंवारता वाढविणे, अतिरिक्त मिस्ट फॉगर्स, फॉग कॅनान व रोटरी अटोमायझर प्रणाली बसविणे, लँडफिल सेल्सवर नियमित मातीचे आच्छादन करणे, लिचेट प्रक्रिया केंद्राची कार्यक्षमता वाढविणे, मिथेन, अमोनिया व इतर वायुचे सतत निरीक्षण करणे, हरित पट्टा विकसीत करणे तसेच अल्पकालीन, मध्यमकालीन व दिर्घकालीन आराखडा सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

सदर प्रकल्पास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ना-हरकत प्रमाणपत्र व प्राधिकार पत्र वेळोवेळी प्राप्त झालेले आहे. सदर सर्व परवानग्यांमधील अटी व शर्तीनुसार कांजूर येथील प्रकल्पाची कामे

प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या प्रचालकामार्फत पार पाडली जातात व याबाबतचे संनियंत्रण महानगरपालिकेकडून करण्यात येते.

(६) मिथेन वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी तसेच त्यासंदर्भातील योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविण्याकरीता मॉनिटरिंग कमिटीच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकामार्फत मे. निरी या संस्थेची नियुक्ती करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत कांजूर येथे दररोज सुमारे ६३०० मे.टन नागरी घन कचरा प्रक्रियेकरीता स्विकारण्यात येतो. त्यापैकी सुमारे १००० मे. टन नागरी घन कचऱ्यावर विंड्रोज खतनिर्मिती तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात येत आहे. उर्वरीत ५३०० मे. टन नागरी घन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोरिएक्टर तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात येते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील खरीप हंगामातील धान खरेदीची मर्यादा वाढविण्याबाबत

**(३०) * ९१५९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यात शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रांवर धान खरेदीची मर्यादा संपल्यामुळे हजारो क्विंटल धान शेतकऱ्यांच्या घरात आणि खळ्यांवर पडून आहे तसेच शासनाने निश्चित केलेले उद्दिष्ट पूर्ण झाल्याने अनेक खरेदी केंद्रे बंद पडल्यामुळे शेतकरी आपला माल विकू शकत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडे तीन वर्षांचा बफर स्टॉक असताना जिल्ह्यात एकंदरीत २० लाख क्विंटल धान खरेदी करायची बाकी असूनही शासकीय खरेदी केंद्रे बंद ठेवल्यामुळे शेतकऱ्यांच्या धान खरेदी योजनेचा मूळ उद्देश साध्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धान विक्री न झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून शासनाने तातडीने धान खरेदीची मर्यादा वाढवून बंद पडलेली खरेदी केंद्रे पुन्हा सुरु करुन भिजलेल्या धान खरेदीसाठी विशेष सवलत द्यावी तसेच ह्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सकारात्मक निर्णय न घेतल्याने शेतकरी वर्ग त्रस्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाखांदूर तालुक्यातील धान खरेदी प्रक्रिया प्रलंबित असण्याच्या कारणांची शासनाने दखल घेऊन शेतकऱ्यांकडील उर्वरित धान तातडीने खरेदी करण्यासाठी खरेदी मर्यादा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) अंशत: खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यात जिल्हा पणन अधिकारी यांच्याकडे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत १८,०४० शेतकऱ्यांकडून दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर एकूण ६,४९,७२३ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाने दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप पणन हंगाम २०२५-२६ करीता राज्यास १ कोटी ४ लाख क्विंटल धान खरेदीच्या उद्दिष्टास मान्यता दिली. या उद्दिष्टाव्यतिरिक्त राज्यास अतिरिक्त १ कोटी क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवुन देण्याची विनंती मा.मुख्यमंत्री महोदयांमार्फत दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास करण्यात आले. याबाबत विविध पातळीवरुन केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात आला. तथापि, केंद्र शासनाने अतिरिक्त खरेदीच्या उद्दिष्टास मान्यता दिलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारुमुळे २२ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३१) * १०६२१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारुमध्ये २१५ लिटर घातक मिथेनॉल मिसळल्याने २२ जणांचा मृत्यू झाल्याची घटना माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यातील फुगेवाडी परिसरात संजयनगरमध्ये डेक्कन पेपर मिलजवळ असलेल्या घरातच पंधरा वर्षापासून गावठी दारुचा व्यवसाय सुरु असल्याप्रकरणी कर्नेलसिंग विरका, इंदरजित विरका, आणि मुलगा गुरुचरण विरका यांना अटक करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दारू प्यायल्यानंतर अवघ्या काही वेळातच नागरिकांना उलट्या होणे, तीव्र पोटदुखी, चक्कर येणे, डोळ्यांची जळजळ आणि अंधुक दिसणे असा त्रास सुरू होवून रुग्णालयात उपचार सुरू असतानाच अनेकांचा काही तासांत मृत्यू झाला असून मृतांमध्ये बहुतांश रोजंदारीवर काम करणारे मजुर होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी मद्यप्राशनामुळे झालेल्या मृत्यूच्या घटनेनंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेऊन पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कर्तव्यात कसूर केल्याचा आणि अवैध दारू विक्रीवर नियंत्रण न ठेवल्याने शासनाने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील २६ शासकीय कर्मचाऱ्यांपैकी निलंबित केलेल्या राज्य उत्पादन शुल्क (Excise Department) विभागाचे १३ अधिकारी आणि पोलीस दलातील ९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, महानगरपालिकेच्या पडताळणीत हा दारु अड्डा अनधिकृत असल्याचे निष्पन्न झालं असून हा दारु अड्डा हटवण्याचा दृष्टीने शासनाने व महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली, तसेच राज्यातील मोठ्या प्रमाणात अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील दापोडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील फुगेवाडी, दापोडी परिसरात तसेच पुणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील पांढरे मळा परिसरात दिनांक २६ मे, २०२६ ते दिनांक २८ मे, २०२६ या कालावधीत मिथेनॉल मिश्रित गावठी दारूचे सेवन केल्याने काही नागरिक बाधित झाल्याची घटना घडली असून यामध्ये २२ जणांचा मृत्यू झाला आहे.
(२) सदर प्रकरणी फुगेवाडी परिसरात संजय नगर मध्ये डेक्कन पेपर मिल जवळ असलेल्या घरात गावठी दारूचा व्यवसाय करणाऱ्यांविरुध्द भारतीय न्याय संहितेचे कलम १०५,१२३,११०,१२५,२७५, ३(५) सह महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (इ), ६८,८१,८३ अंतर्गत दिनांक २९/०५/२०२६ रोजी दापोडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ११४/२०२६ नोंद करण्यात आला आहे. यामध्ये कर्नेलसिंग विरका, इंदरजित विरका आणि गुरुचरण विरका यांना अटक करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) हे खरे आहे.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे एकूण १३ अधिकारी/कर्मचारी व पोलीस विभागाचे १३ अधिकारी/कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत.
(६) दापोडी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामधील विषारी दारू विक्री झालेल्या दारू अड्ड्याचे अनधिकृत बांधकाम पिंपरी चिंचवड महापालिकेने निष्कासित करण्याची कारवाई केली आहे.

तसेच, पुणे महानगर पालिका क्षेत्रातील २ आरोपींच्या ठिकाणाची पाहणी करून संबंधीतास नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणेबाबत

**(३२)** * **९९३६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर तेथील काही प्रशासकीय व नागरी सुविधांबाबत प्रवासी तसेच स्थानिक कामगारांकडून विविध तक्रारी प्राप्त झाल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमानतळ प्रशासनाकडून काही स्थानिक व अनुभवी कामगारांना कामावरून कमी करण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत तसेच विमानतळासाठी सार्वजनिक वाहतूक सुविधांची उपलब्धता व वारंवारता अपुरी असल्याने प्रवाशांना पर्यायी वाहतूक साधनांवर अवलंबून राहावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विमानतळाच्या पार्किंग क्षेत्रात मोबाईल नेटवर्कच्या उपलब्धतेबाबत अडचणी निर्माण होत असून तसेच विमानतळ परिसरातील व्यावसायिक सेवा व वस्तूंच्या दरांबाबत प्रवाशांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विमानतळ परिसरात दिशादर्शक फलक, रस्ते मार्गदर्शन व्यवस्था, प्रकाशव्यवस्था तसेच अन्य मूलभूत नागरी सुविधांबाबत त्रुटी असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कामगार, प्रवासी सुविधा व इतर व्यवस्थापनासंदर्भातील विविध बाबींविषयी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२६ मध्ये

मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून आवश्यक कार्यवाहीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनातील बाबींची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमानतळावरील कामगारांच्या समस्या, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पार्किंग क्षेत्रातील मोबाईल नेटवर्क, दिशादर्शक फलक, प्रकाशव्यवस्था व अन्य प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सार्वजनिक तसेच खासगी वाहतुकीचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. चलो बस (Chalo Bus) व नवी मुंबई महानगरपालिका परिवहन (NMMT) यांच्या बससेवा उपलब्ध असून N.M.M.T. मार्फत टर्मिनल-१ ते खारकोपर, तारघर, बेलापूर, नेरूळ, पनवेल, खांदेश्वर व एअरपोर्ट प्रोजेक्ट ऑफिस या सात मार्गांवर बससेवा सुरू आहेत. ॲप-आधारित टॅक्सी सेवा (Uber, Ola, Rapido, All Miles, Alyte), प्री-पेड टॅक्सी सेवा (First Car, WTI Cabs) तसेच महाराष्ट्र शासनाद्वारे भारत प्री-पेड टॅक्सी सेवा लवकरच कार्यान्वित होत आहे. याशिवाय विमानतळामार्फत नजीकच्या महत्वाच्या ठिकाणांशी व सार्वजनिक वाहतूक केंद्रांशी जोडणारी शटल बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त मुंबई, पुणे व नाशिक या शहरांसाठी अधिक बससेवा, भाडेतत्त्वावरील वाहन सेवा व ॲप-आधारित रिक्षा सेवा उपलब्ध करण्याचे नियोजित आहे.

(३) हे खरे आहे, मार्च २०२६ मध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) परिसरातील मोबाईल नेटवर्क सुविधेच्या समस्येबाबत X (पूर्वीचे ट्विटर) या सामाजिक माध्यमावरील एका पोस्टद्वारे लक्ष वेधण्यात आले होते. त्यानुषंगाने सिडको महामंडळामार्फत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासनास कळविण्यात आले होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासनाने संबंधित सेवा प्रदात्यांशी समन्वय साधून २ ते ३ आठवड्यांत मोबाईल नेटवर्कची समस्या दूर केली आहे. सद्य:स्थितीत BSNL, Jio, Airtel व Vodafone Idea या दूरसंचार सेवा प्रदात्यांमार्फत विमानतळ व परिसरात अखंड मोबाईल सेवा उपलब्ध आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासनाने कळविल्यानुसार विमानतळ परिसरात आवश्यक त्या प्रमाणात दिशादर्शक फलक, रस्ता मार्गदर्शन व्यवस्था, प्रकाश व्यवस्था तसेच इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोअर परेल येथील वकील चाळीच्या पुनर्विकासात अनियमितता झाल्याबाबत

**(३३) * १०५३० श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका हददीतील जी /दक्षिण मधील सी.एस.क्र १५२ या भूखंडावर ३३ (७) अन्वये वकील चाळ, लोअर परेल या बैठ्या चाळींच्या पुनर्विकासात विकासक ओम शांती मेसर्स यांनी नियमाचे उल्लंघन करुन इमारतीचे बांधकामात अनियमितता केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने इमारतींची पुर्नबांधणी करताना इमारतींच्या आवारात अनधिकृत भिंत बांधली असून यासदंर्भात संबंधित विभागाकडे नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर सहा.विभागीय अग्नीशमन अधिकारी, बृ.मुं.पा यांनी दिनांक २४/०५/२०२४ रोजी सहाय्यक अभियंता, जी/द (बिल्डींग विभाग) व कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव शहर) यांना उक्त विकासकाने केलेल्या अनधिकृत बांधकामावर तात्काळ कारवाई करण्याबाबत पत्राद्वारे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने दिनांक २० जुलै, २०२४ कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव शहर) यांना इमारतीमध्ये केलेले अनधिकृत बांधकाम विकासक निष्कासित करीत नाही तोपर्यंत विकासकास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येऊ नये असे सक्त आदेश पत्राद्वारे दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहा.विभागीय अग्नीशमन अधिकारी, यांनी सहायक अभियंता (बिल्डींग विभाग) व कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव शहर) यांना पत्राद्वारे दिलेल्या आदेशांचे /सूचनाचे पालन करुन सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या विकासकावर व त्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

सि.एस.क्र. १५२, लोअर परेल येथील वकील चाळ या बैठ्या चाळीचा पुनर्विकास विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे विनियम ३३(७) अन्वये महापालिकेस प्राप्त प्रस्तावानुसार महापालिकेने अंतिम आराखडे दिनांक १३/१२/२०१९ रोजी मंजूर करण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक ०८/०४/२०२३ रोजी पुनर्विकसित इमारतीस अंशतः भोगवटा प्रमाणपत्र (Part Occupation Certificate) दिल्यानंतर महापालिकेस प्राप्त तक्रारीवरून स्थळ पाहणी केली असता बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अनधिकृत भिंत बांधण्यात आल्याचे मार्च, २०२४ मध्ये निदर्शनास आले असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

सहाय्यक विभागीय अग्नीशमन अधिकारी यांनी स्थळ पाहणी अहवाल सादर केला असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी जी/दक्षिण यांचेकडून कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर यांना पत्र देण्यात आले असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्राप्त तक्रारीनुसार बृहन्मुंबई महानगरपलिकेच्या इमारत व कारखाने विभागाने स्थळ पाहणी करून तेथील अनधिकृत भिंतीचे बांधकाम दिनांक ३१/०५/२०२४ रोजी निष्कासित केले असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

(६) लागू नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील हाऊसकिपींगच्या निविदेमध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३४) * १०४७७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयात हाऊसकिपींग निविदेमध्ये रुपये ४५ कोटी एवढ्या रकमेचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब दिनांक ६ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित निविदा ऑटा एफएमएस प्रा.लि. कंपनीने अंदाजित खर्चापेक्षा २० टक्क्याहून कमी दराने नमूद केली असून येथील आरोग्य विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संगनमताने ऑरा कंपनीला कंत्राट मिळेल यासाठी निविदा प्रक्रियेत फेरफार केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही कंपनी केवळ पुढे असून प्रत्यक्ष काम वादग्रस्त हायवे कंस्ट्रक्शन कंपनीकडून घेतले जाणार असून ही कंपनी कामगारांसाठी कोणतीही कामगार कायद्यानुसार तरतूद करणार नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निविदा प्रक्रियेत संगनमत करून फेरफार झाला असून शासनाने सदर निविदा रद्द करुन दोषी कंत्राटदाराना काळया यादीत टाकून संबंधित दोषींवर आणि कंत्राटदार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांत स्वच्छतेच्या कामकाजाकरीता लागणाऱ्या सेवा पुरवठादाराचा सन २०२२ ते सन २०२५ चा कालावधी संपुष्टात आला. त्यानंतर पुढील ३ वर्षाकरीता विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. याकरीता सन २०२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेमध्ये निविदाकाराने लघुत्तम दर (L१) अंदाजित रक्कम रुपये १२० कोटी पेक्षा १६% कमी दराने निविदा दाखल केली आहे. सद्य:स्थितीत निविदा अंतिम करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(३) मे.ऑरा एफएमएस प्रा.लि. यांनी सादर केलेल्या कागदपत्रानुसार सदरचा निविदाकार कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत आहे. तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार काम उपकंत्राटदारास (Sublet) देण्याची तरतूद नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील विनाआरक्षित भूखंडावर झोपडपटटी सुधारणा योजना आरक्षण दाखविल्याबाबत

**(३५)** * **९०५५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नेतीवली, कल्याण (पुर्व) येथील सर्व्हे नं १०/अ, हिस्सा नं १/१ नेतीवली या भूखंडावर कोणतेही आरक्षण नसताना "झोपडपटटी सुधारणा योजना" असे आरक्षण असल्याचे दाखवून बोगस टीडीआर मंजूर केल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर वाडेभिंत बांधण्याबाबतचे आदेश निर्गमित होऊनही अदयाप बांधकाम करण्यात आलेले नसून युडीसीपीआर २०२० मध्ये रहिवासी क्षेत्राचा टीडीआर मंजूर करण्याबाबत कोणतीही तरतुद नसताना दिशाभूल करुन आर्थिक हित साधण्याकरीता बोगस टीडीआर मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महानगरपालिका हद्दीत क्लस्टर योजना लागू नसतानाही आर्थिक फायदयाकरीता बांधकाम व्यावसायिकांना बोगस टीडीआर मंजूर करुन देण्यात आलेला असून सदर प्रकरणी जबाबदार व दोषी आढळून आलेल्या तत्कालीन सहा संचालक नगररचना, संबंधित कनिष्ठ अभियंता, अनुरेखक, सर्व्हेअर यांच्यासह जागा मालक वास्तुविशारद इत्यादीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन बोगस टीडीआर तात्काळ रदद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मौ.नेतिवली येथील स.नं.१०/अ/१/१ क्षेत्र सुमारे ४६५०.०० चौ.मी. भूखंडावर मंजूर विकास योजनेनुसार 'झोपडपट्टी सुधारणा योजना' असे निर्देशन/वापर असून, सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे दिनांक २४/१२/२०२१ रोजीच्या मार्गदर्शन पत्राच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने यापैकी अतिक्रमण विरहीत ४२५१.०० चौ.मी. क्षेत्राचा खुला ताबा घेऊन व सदर भूखंडास वाडेभिंत न बांधल्याने त्यामध्ये १५% क्षेत्र वजावट करून हस्तांतरनीय विकास हक्क प्रदान केले आहे.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने UDCPR च्या विनियम १४/०८/१ (ii) (b) मधील तरतुदीनुसार नागरी पुनरूत्थान आराखडे अधिसुचित केले असून, विषयाधीन भूखंड सदर अधिसूचित क्षेत्रात अंतर्भूत आहे. विषयाधीन जमीन महानगरपालिकेस आवश्यक असल्यास सदर जमिनीचा मोबदला विनियम १४/०८/८ (iv) (c) नुसार TDR च्या स्वरूपात अनुज्ञेय असेल तर यापुर्वी दिलेला DRC रद्द करण्याची आवश्यकता नाही व सदर तरतुदीनुसार जमिनीचा मोबदला DRC च्या स्वरूपात देय नसल्यास महानगरपालिकने यापुर्वी दिलेला DRC रद्द करून अर्जदार यांची जमीन परत देण्याची कार्यवाही करावी, असे शासनाने महानगरपालिकेस दिनांक २३/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. विनियम १४/०८/८ (iv) (c) मधील तरतुदीनुसार सदरचा भूखंड TDR च्या मोबदल्यात महानगरपालिकेस प्राप्त झालेला असल्याने कारवाई करण्याची अथवा TDR रद्द करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (पूर्व) मुंबई येथील प्रेमलीला हाईटस या गृहनिर्माण प्रकल्पाचे सी.सी. प्रमाणपत्र रद्द केल्याबाबत

**(३६) * ८९४९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (पूर्व) येथील प्रेमलीला हाईटस हा गृहनिर्माण प्रकल्प दोन भागीदारांमार्फत मेसर्स प्रेमलीला डेव्हलपर्स या नावाने राबविण्यात येत असून विकासकाने वैधानिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या नसल्याने व थकबाकी न भरल्यामुळे एस.आर.ए. प्राधिकरणाने सी.सी. प्रमाणपत्र रद्द केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राधिकरणाने काम थांबविण्याच्या नोटीसा बजावूनही विकासकाने अटी शर्तीचे उल्लंघन करत सदनिकांची अनधिकृत विक्री करुन खरेदीदारांचा निधी इतरत्र वळविण्यात आला आहे तसेच विकासकांविरुध्द अनेक आर्थिक वाद व कायदेशीर दावे प्रलंबित असल्यामुळे याप्रकरणी एफआयआर नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन भागीदारांपैकी एक भागीदार फरार असून सदर गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिकाधारकांनी महारेराकडे cc ००६००००००३७४८९८ अन्वये २२/०३/२०२३ रोजी तक्रार दखल केली असून याबाबत दिनांक २९/०७/२०२४ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान विकासकांच्या अनुपस्थितीमुळे महारेराने २१/०३/२०२५ रोजी अंमलबजावणीचा आदेश पारित करुनही अद्याप आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित गृहप्रकल्पाची शासनाने चौकशी करुन चौकशीअंती काय निष्पन्न झाले तसेच फरार विकासकांवर कारवाई करण्यासह सदर प्रकल्प पर्यायी विकासकांकडे देणे किंवा म्हाडाने पूर्णत्वास नेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) पहाडी गोरेगाव, गोरेगाव (पूर्व) येथील श्रेयस सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे विकासक मे. प्रेमलीला डेव्हलपर्स आहेत. सदर योजनेतील पुनर्वसन इमारतीचे काम पूर्ण झाले असून या इमारतीस दिनांक २४ जानेवारी, २०१९ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सदर योजनेतील विक्री घटकाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. तथापि, थकीत घरभाडे अदा न केल्यामुळे, बँक हमीपत्र मुदतबाह्य झाल्यामुळे व अधिमूल्य भरण्यास दिलेल्या सवलतीमध्ये रक्कम भरणा न करणे (डिफरमेंट पेमेंट) इ. कारणांमुळे सदर योजनेतील विक्री घटकास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत स्थगिती आदेश (Stop work) देण्यात आलेले आहेत. तसेच, सदर प्रकल्पाबाबत वनराई पोलीस ठाण्याच्या अभिलेखानूसार कोणताही गुन्हा दाखल असल्याचे दिसून येत नाही.

(३) व (४) सदर गृहनिर्माण प्रकल्पातील विक्री घटकातील सदनिका खरेदीदाराने महारेरा प्राधिकरणाकडे दाखल केलेली तक्रार क्र. cc ००६००००००३७४८९८ च्या अनुषंगाने महारेरा प्राधिकरणाने सदर प्रकरणी खरेदीदारास ३० दिवसांत घराचा ताबा द्यावा. तसेच, झालेल्या विलंबाबाबत व्याज द्यावे असे दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी निर्देश दिलेले आहेत. तसेच, यासंदर्भात घरखरेदीदाराने आदेशाची अंमलबजावणी न

झाल्याबाबत, महारेरा प्राधिकरणाकडे कोणताही तक्रार अर्ज (Non Compliance Application) दाखल केलेला नाही. सदर प्रकरणी महारेरा प्राधिकरणाने रेरा अधिनियमातील तरतुदीनूसार कार्यवाही केलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जप्त केलेला गुटखा साठा परराज्यात नेण्यास नियमबाह्य परवानगी दिल्याबाबत

**(३७) * १०२२६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असतानाही जप्त केलेला रुपये १० कोटींचा गुटखा साठा परराज्यात नेण्यास नियमबाह्य परवानगी दिल्याची बाब दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाचे आदेश डावलून सदर गुटखा साठा सोडण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मदत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधातील मोहीम अधिक तीव्र करुन राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विशेष तपास पथके कार्यरत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेश डावलून सदर गुटखा साठा सोडण्यासाठी जबाबदार असणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) अन्न व औषध प्रशासनाने प्रतिबंधित गुटखा परराज्यात नेण्यास परवानगी दिली नाही.

तथापि, अन्न व औषध प्रशासनाने भिवंडीतील हाय स्ट्रीट इम्पेक्स एलएलपी व पुण्यातील सोएक्स इंडिया प्रा. लि. या कंपनीतून हुक्का तंबाखू पेस्ट (स्मोकींग तंबाखू) पदार्थ अन्न व सुरक्षा मानके कायदा, २००६ मधील "अन्न" या पदार्थाच्या व्याख्येत येत असल्याचा निष्कर्ष काढून जप्त करण्यात आला होता. तद्नंतर उक्त नमूद कंपन्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक १२०४/२०२६ व १२०६/२०२६ दाखल केली होती.

दरम्यानच्या कालावधीत अन्न व औषध प्रशासनाने सदर पदार्थ अन्न या व्याख्येत मोडतो किंवा कसे याबाबत अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शन घेतले.

त्यानुषंगाने अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दिनांक २३/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर पदार्थ अन्न या व्याखेत मोडत नसल्याबाबतचे अभिप्राय दिले असल्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने केलेली कार्यवाही विधिग्राहय ठरली नाही.

तसेच उक्त नमूद कंपन्यांनी सदर पदार्थ निर्यातीसाठी व इतर राज्यात विक्रीसाठी असल्याचे मा.उच्च न्यायालयात शपथपत्राद्वारे सादर केले होते. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०६/०३/२०२६ रोजी रिट याचिका क्रमांक १२०४/२०२६ व १२०६/२०२६ मध्ये पारित केलेल्या आदेशानुसार प्रशासनाने सुरक्षेची काळजी घेवून सदर पदार्थ पोलीस संरक्षणात राज्याबाहेर पाठविण्यास परवानगी दिली होती.

प्रशासनामार्फत राज्यात १ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीत एकूण ६१३ आस्थापनांच्या तपासणी केल्या असून त्यापैकी ६०५ आस्थापनांमध्ये रुपये ८१,७१,३०,०२८/- इतक्या किमतींचा प्रतिबंधित पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर कालावधीत एकूण १९१ वाहने जप्त करण्यात आली असून त्यांची किंमत रुपये १३,७६,४८,७०९/- अशी आहे. तसेच २११ आस्थापना सील करण्यात आल्या असून सर्व प्रकरणी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आले आहेत.

सदरचा पदार्थ अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत बंदी असलेला गुटखा व तत्सम अन्नपदार्थ असल्याचे समजून कारवाई केलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिनांक १७/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समता नगर, कांदिवली (पू) (मुंबई) येथील मे. एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. यांनी सेवाशुल्काचा भरणा केला नसल्याबाबत

**(३८) * ९१५३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा घटक) यांनी मे. एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. (समता नगर, कांदिवली-पु.) यांना सेवाशुल्काचे रुपये ४९.०९ कोटी व जलदेयकाचे ३.९९ कोटी इतक्या रकमेचा भरणा न केल्यामुळे वास्तव्याचा दाखला देण्यात येऊ नये अशी भूमिका घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विकासक मा.उच्च न्यायालयात गेल्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवाशुल्काचे परिगणन करून थकबाकी ८ दिवसात भरणा करण्याबाबत विकासकास माहे जानेवारी, २०२५ मध्ये कळविण्यात आले असूनही अद्यापपर्यंत सेवा आकार व इतर शुल्काचा भरणा केलेला नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समता नगर येथील मे. एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. यांनी सेवाशुल्काचे भरणा न केल्याबाबत चौकशी करुन कोट्यवधींच्या शुल्काचा भरणा न करणाऱ्या मे. एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. वर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) म्हाडाने दिनांक ११/०१/२०२३ रोजी सेवाशुल्काची व दिनांक ०७/११/२०२३ रोजी जलदेयकाची रक्कम भरण्याबाबत संबंधित विकासकास कळविले होते. तसेच, सदर थकबाकीची रक्कम भरणा केल्याशिवाय संबंधित विकासकास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येऊ नये असेही निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई म्हाडा यांना निर्देशित केले होते.

(२) व (३) सदर प्रकरणी मे. एस.डी. कार्पोरेशन प्रा.लि. यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ११६९०/२०२३ दाखल केलेली आहे. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३/०१/२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार, शासन पत्र दिनांक १५/१२/२०२३ अन्वये जुन्या दराने सेवाशुल्काची परिगणना करून रक्कम रुपये १६,९६,८५,२१६/- भरणेबाबत विकासक मे. एस.डी. कार्पोरेशन प्रा.लि. यांस म्हाडाकडून दिनांक १७/०१/२०२५ रोजी कळविण्यात आले होते. त्यानंतर सुधारीत दरानुसार पुर्नपरिगणना

केलेली सेवाशुल्काची एप्रिल, २०२६ पर्यंतची थकबाकी रुपये १६,७०,५४,४८७/- भरणेबाबत म्हाडाकडून विकासकास दिनांक १९/०५/२०२६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. परंतु अद्याप विकासकाने सदर रकमेचा भरणा केलेला नाही.

तसेच जलदेयकाची थकीत रक्कम रुपये ३,९९,८५,३३६/- भरणेबाबत विकासक यांना दिनांक ०७/११/२०२३ व दिनांक २२/१२/२०२३ रोजीच्या पत्रांन्वये म्हाडाकडून कळविले आहे. परंतु विकासकाने थकीत जलदेयकाचे रकमेचाही भरणा केलेला नाही.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयातील रुग्णांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * ९७०२ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयातील औषधोपचार (मेडिसीन) विभागात आजारपण, रजा आणि काही डॉक्टरांच्या राजीनाम्यामुळे बाह्य रुग्ण विभाग (ओपीडी) हा इतर विभागातील डॉक्टरांकडून तात्पुरत्या स्वरूपात चालविला जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना वेळेवर तपासणी व उपचार मिळण्यात अडचणी उद्‌भवत असून काही ठिकाणी तपासण्या उशिरा होत असल्याने उपचार प्रक्रियेलाही विलंब होत असल्याची तक्रार रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २०० खाटांच्या या रुग्णालयात बाह्य रुग्ण विभागात (ओपीडीत) दररोज ५०० ते १००० रुग्णांची गर्दी असते तर सुमारे १०० रुग्ण दैनंदिन दाखल होतात याशिवाय दररोज चार ते पाच शस्त्रक्रिया केल्या जातात परंतु अत्यावश्यक यंत्रणा बंद पडल्याने तसेच वैद्यकीय मनुष्यबळ अपुरे असल्याने रुग्णालयातील आरोग्यसेवा सध्या पूर्णपणे कोलमडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालय प्रशासनाने तातडीने डॉक्टरांची संख्या वाढवून आरोग्य सेवा सुरळीत करावी अशी मागणी नागरिकांकडून होत असून सदर रुग्णालयातील सोनोग्राफी आणि सीटी स्कॅन मशीन बंद असल्याने रुग्णांचे निदान करणे कठीण झाले असून तपासणीसाठी आलेल्या रुग्णांना, विशेषतः तातडीच्या (Trauma) रुग्णांना, नाईलाजाने इतर महानगपालिका रुग्णालयांमध्ये जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त असलेल्या पदावर नवीन डॉक्टरांची नियुक्ती करुन सदर रुग्णालयातील सोनोग्राफी, एक्स- रे मशीन रुग्ण सेवेसाठी सुस्थितीत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, रुग्णालयात अपुऱ्या सुविधा असण्यास जबाबदार संबंधित अधिकाऱ्यांवर व नियमितपणे गैरहजर राहणाऱ्या डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

सदर रुग्णालयामध्ये औषधोपचार विभागात एकूण १७ डॉर्क्ट्स इतकी मंजूर पदसंख्या असून २ वैद्यकीय अधिकारी यांनी माहे मार्च, २०२६ मध्ये राजीनामा दिला आहे. सध्या सदर विभागात ६ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

सदर रुग्णालयाच्या सेवेवर परिणाम होऊ नये यासाठी रुग्णालयाच्या इतर विभागातील वैद्यकीय अधिकारी यांची औषधोपचार विभागात चक्राकर पध्दतीने (Rotation) सेवा उपलब्ध करुन दिली जाते.
(२) हे अंशत: खरे आहे.

यासंदर्भात रुग्णांना वेळेवर उपचार न मिळाल्याबाबत रुग्णांकडून तसेच त्यांच्या नातेवाईकांकडून मौख्यिक तक्रारी केली जातात, ही बाब खरी आहे.

तथापि, रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेल्या डॉक्टरांमार्फत रुग्णांना सेवा पुरविण्यात येते. तसेच महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या लाईफनिटी या कंपनीद्वारे रक्ताच्या चाचण्या १२ तास केल्या जातात. सर्व एक्स-रे व सोनोग्राफीच्या तपासण्या वेळेवर करुन सर्व रुग्णांना वेळेवर उपचार देण्यात येतात.
(३) हे खरे नाही.

सदर रुग्णालय हे २६६ खाटांचे असून दररोज ५०० ते ७५० बाह्यरुग्ण असतात. त्यापैकी अंदाजे दररोज २५ ते ३० रुग्ण दाखल होत असतात.
रुग्णालयात दररोज वेगवेगळया प्रकारच्या सरासरी १० शस्त्रक्रिया केल्या जातात.
(४) व (५) अंशत: खरे आहे.

जोगेश्वरी येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयात १ सोनोग्राफी मशीन चालू आहे. दरम्यान सीटी स्कॅन मशीन दिनांक २५ एप्रिल, २०२६ पासून बंद असून त्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. तोपर्यंत रुग्णांना सीटी स्कॅन तपासणीसाठी महानगरपालिकेच्या कूपर रुग्णालयात पाठविण्यात येते. यासाठी रुग्णालयाची रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात येते.

रुग्णांच्या सेवेवर परिणाम होऊ नये यासाठी रुग्णालयाकडून कंत्राटी पध्दतीने डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतात.
(६) रुग्णालयामध्ये उपस्थितीकरीता बायोमॅट्रीक प्रणालीमार्फत हजेरी घेण्यात येते. त्यानुसार डॉक्टर्स नियमितपणे गैरहजर असल्याचे दिसून आले नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील प्रस्तावित लंडन स्ट्रीट प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केल्याबाबत

**(४०) * ९१६५ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामला (जि.नागपूर) परिसरातील प्रस्तावित लंडन स्ट्रीट प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली असून त्या बदल्यात १० हजार झाडे लावण्याचे आश्वासन देऊनही सदर प्रकल्पासाठी

वृक्षतोड करताना पर्यायी वृक्षारोपणाची अट असतानाही गत अडीच वर्षांच्या कालावधीत या अटीचे उल्लंघन करण्यात आले असून माहे एप्रिल, २०२६ पर्यंत एकही वृक्ष लावला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यायी वृक्षारोपण न झाल्यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून मा.उच्च न्यायालयाने याची दखल घेत प्रकल्पास स्थगिती देण्याचा इशारा दिलाअसून शासकीय नियमावलीनुसार वृक्षतोडीच्या मोबदल्यात झाडे लावणे बंधनकारक असतानाही प्रशासनाकडून झालेल्या या दिरंगाईमुळे विकास प्रकल्पाच्या कामात कायदेशीर अडथळे निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात अशा प्रकल्पांच्या बाबतीत वृक्षतोडीपूर्वीच पर्यायी वृक्षारोपण पूर्ण करणे अनिवार्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नागपूर महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाद्वारे जून, २०२३ मध्ये खामला परिसरातील ऑरेंज सिटी स्ट्रीट (लंडन स्ट्रीट) प्रकल्पाअंतर्गत भूखंड क्र. ५ वरील एकूण ७३ झाडांची वृक्षतोड करण्याची परवानगी खाजगी विकासकास देण्यात आली आहे. तसेच नोव्हेंबर, २०२५ मध्ये अमेनिटी स्पेस क्र. ५ या भूखंडावरील एकूण ७३ झाडांची वृक्षतोड करण्याची महानगरपालिकेच्या बांधकाम विभागास परवानगी देण्यात आली आहे. तोडण्यात येणाऱ्या वृक्षांच्या मोबदल्यात विकासकाद्वारे १०,१३१ वृक्ष व महानगरपालिकेद्वारे २,१९८ वृक्ष अशा एकूण १२,३२९ पर्यायी वृक्षांची दाभा, तेलंगखेडी, भांडेवाडी डम्पिंग यार्ड, पांढराबोडी येथे करण्यात आली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पातील बाधित होणाऱ्या व तोडण्यात येणाऱ्या विविध प्रजातींच्या झाडांबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे SUO MOTO PIL No. १०/२०२६ दाखल असून सदर प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या आदेशान्वये पुढील आदेशापर्यंत वृक्षतोड करण्यात येवू नये असे आदेश दिले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या बायोमायनिंग प्रकल्पात अनियमितता झाल्याबाबत

**(४१) * १०६२८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये साठलेल्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रुपये २१ कोटींच्या बायोमायनिंग प्रकल्पात महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात

गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रति टन रुपये ५५० एवढा दर ठरलेला असताना भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रति टनाला रुपये ७०० दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सदर बायोमायनिंग प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत निविदा मंजूर केलेल्या कंपनीला यापूर्वीचा बायोमायनिंग क्षेत्रात काम करण्याचा कोणताही अनुभव नसतानाही तसेच सदर कंपनीची आर्थिक उलाढाल किमान पात्रता निकषांपेक्षा कमी असतानाही व इतर पात्र कंपन्यांना अपात्र करत निविदा मंजूर करत कार्यारंभ आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने बायोमायनिंग प्रकल्पासाठी दिलेला कार्यारंभ आदेश तातडीने रद्द करत सदर निविदा प्रक्रियेची शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) केंद्र शासनाने मंजूरी दिल्यानुसार कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी प्रति टन ५५० रुपये इतका दर निश्चित करण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रियेनुसार पात्र ठेकेदार यांनी सादर केलेल्या दरामध्ये बायोमायनिंग प्रक्रिया करणे व प्रक्रिया नंतर निघालेला RDF, INERT MATERIAL, BIO-SOIL इ. घटकांची विल्हेवाट लावण्याचे काम देखील असल्यामुळे प्रतिटन रुपये ७०० इतक्या अधिक दराची निविदा भरली. तथापि, निविदेतील प्रचलित नियमांनुसार वाटाघाटी अंती पात्र ठेकेदाराकडून रुपये ६७० प्रतिटन इतका दर निश्चित करण्यात आला.

सदर निविदेमधील अटी शर्तीनुसार Joint Venture अधिकृत केले असल्याने निविदाकारास पात्र होणेसाठी जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया केलेचा अनुभव व मागील तीन वर्षातील आर्थिक उलाढाल हे निकष पूर्ण करणारे न्युनतम दराचे निविदाकारच पात्र ठरविण्यात आले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह प्रमुख शहरांमधील पदपथांवर अनधिकृत फेरीवाले वास्तव्य करित असल्याबाबत

**(४२) * १००६४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सीएसएमटी ते कुलाबा कॉजवे आणि परिसरासह पुणे, नाशिक, आणि ठाणे यांसारख्या प्रमुख शहरांमधील पदपथांवर बेकायदा फेरीवाल्यांचे मोठे साम्राज्य पसरले आहे. यामध्ये बांगलादेशी व परदेशी नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असून, ते बनावट ओळखपत्रांचा वापर करून व्यवसाय करत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जर कोणी परदेशी किंवा बांगलादेशी नागरिक विनापरवाना किंवा बेकायदेशीरपणे राहत असल्याचे आढळल्यास, त्यांना त्यांच्या मूळ देशात परत पाठविण्याची (deportation) कायदेशीर प्रक्रिया राबवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बेकायदा फेरीवाल्यांमुळे शहरातील पदपथ पूर्णपणे अडविले गेल्याने सर्वसामान्य नागरिकांना चालणे कठीण झाले असून, त्यांची कोणतीही अधिकृत ओळख किंवा पार्श्वभूमी तपासलेली नसल्याने सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील सर्व फेरीवाल्यांची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्या वास्तव्याची सखोल पडताळणी करण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही प्रभावी यंत्रणा राबविली जात नसल्याने या संशयित फेरीवाल्याना ओळखणे कठीण जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दखल घेऊन शहरातील पदपथ मोकळे करण्यासाठी व बांगलादेशी फेरीवाल्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी कोणती विशेष मोहीम व उपाययोजना करण्यात आल्यात तसेच प्रत्येक फेरीवाल्याची ओळख निश्चित करण्यासाठी 'बायोमेट्रिक' प्रणाली किंवा विशेष ओळखपत्र सक्तीचे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ए-वार्डमधील सीएसएमटी ते कुलाबा कॉजवे येथे सर्वेक्षणानुसार पथविक्रेते आढळून आले. त्यांची पोलीस आयुक्तालयाने केलेल्या तपासणीनुसार बांगलादेशी व परदेशी पथविक्रेते आढळून आले नाहीत.

महानगरपालिकेने केलेल्या निष्कासनाच्या कारवाईविरोधात पथविक्रेत्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनतर मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १२ डिसेंबर, २०२४ च्या आदेशाविरोधात त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २१ मे, २०२५ रोजीच्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचा निर्णय होईपर्यंत कारवाई करू नये, असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सदर ठिकाणी पथविक्रेते व्यवसाय करीत आहेत. त्यानुसार २५३ पथविक्रेत्या व्यतिरिक्त इतर पथविक्रेते आढळून आल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून त्वरित निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

पुणे, नाशिक, आणि ठाणे या शहराच्या पदपथावरील फेरीवाल्यामध्ये बांगलादेशी व परदेशी नागरिक बनावट ओळखपत्रांचा वापर करून व्यवसाय करत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(२) हे खरे आहे.

याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी आदेश दिले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) बृहन्मुंबईतील सन २०१४ मध्ये सर्वेक्षण करण्यात आलेल्या पथविक्रेते यांची अधिकृत ओळख पटविण्यासाठी त्यांना क्यु आर कोड आधारीत ओळखपत्र देण्याचे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७५०/२०१६ मध्ये दिनांक ६ मे, २०२६ रोजी आदेश पारित केले आहेत. त्यानुसार ९९,४३५ फेरीवाल्यांपैकी ४८,००० फेरीवाल्यांच्या ओळखीची पडताळणी पूर्ण झाली आहे. उर्वरीत पथविक्रेत्यांची पडताळणी करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेडून सुरु आहे.

या व्यतिरिक्त पोलीस विभागाकडून अनधिकृत फेरीवाल्यांविरुध्द कायदेशीर कारवाई व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

(५) सर्वेक्षण झालेल्या फेरीवाल्याची ओळख निश्चित करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून क्यू आर कोड आधारित ओळखपत्र देण्यात येत आहे. तसेच पुणे, नाशिक आणि ठाणे महानगरपालिकेकडून बायोमेट्रिक पध्दतीने नोंदणी करुन ओळखपत्र देण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये कंत्राटी पध्दतीने बोगस डॉक्टरांची सेवा उपलब्ध करुन देण्यात येत असल्याबाबत

**(४३) * १०४९१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मनुष्यबळ पुरविणाऱ्या कंत्राटदारांनी बनावट शैक्षणिक कागदपत्रे व नोंदणी नसलेले डॉक्टर पुरविल्याचे निदर्शनास आले असून भगवती रुग्णालय, बोरिवली व व्ही.एन.देसाई उपनगरीय रुग्णालय, सांताक्रुझ येथे बोगस डॉक्टर पुरविणाऱ्या कंत्राटदारावर एक वर्षे होऊनही अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्याची बाब दिनांक ११ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्ही.एन.देसाई उपनगरीय रुग्णालयात कंत्राटदाराने नेमलेल्या आणखी दोन बनावट डॉक्टरांबद्दल दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी स्पष्टीकरण मागविण्यात आले होते तसेच यापूर्वीही शैक्षणिक अर्हता नसलेले ४० ते ५० बोगस डॉक्टर रुग्णालयाला उपलब्ध करण्यात आल्याची कागदपत्रे अद्याप सादर करण्यात आलेली नसून बृहन्मुंबई महानगरपालिकेने संबंधित कंत्राटदार संस्थेला कारणे दाखवा नोटीस बजावत स्पष्टीकरण मागितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने बोगस डॉक्टरांच्या समूळ उच्चाटनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने धडक शोध मोहीम देखील हाती घेऊन बोगस डॉक्टर व या डॉक्टरांची नेमणूक करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने ११ उपनगरीय रुग्णालयांत कंत्राटी पध्दतीने अतिदक्षता विभागात डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध करुन घेतल्या होत्या. त्यापैकी व्ही.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ येथे २ डॉक्टरांची व भगवती रुग्णालय, बोरीवली येथे १ डॉक्टरांची पदवी परदेशी वैद्यकीय पदवी असल्याचे तसेच संत मुक्ताबाई रुग्णालय, घाटकोपर येथे १ डॉक्टरांची पदवी बी.एच.एम.एस. (BHMS) असल्याचे निदर्शनास आले आहे.

भगवती रुग्णालय, बोरीवली येथे नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारास दिनांक ५ जुलै, २०२३ व व्ही.एन.देसाई रुग्णालय, सांताक्रुझ, येथे नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारास दिनांक १० जून, २०२६,

संत मुक्ताबाई रुग्णालय, घाटकोपर येथे नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारास दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या आदेशान्वये काळ्या यादीत टाकण्यात आले. तसेच कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांची सेवा खंडीत करण्यात आल्या आहेत. तसेच, अधिदानासाठी त्यांची देयके रोखून ठेवण्यात आली आहेत.

माहे सप्टेंबर, २०२५ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ११ उपनगरीय रुग्णालयात अतिदक्षता विभागातील बाह्यस्त्रोतीकरणाने घेण्यात येणाऱ्या सर्व सेवा बंद करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.